# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२५

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण १८, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५९**

---

### राज्यातील महिला व बालसुधारगृहाच्या सुरक्षा व व्यवस्थापनातील त्रुटींमुळे मुलींनी पलायन केल्याबाबत

**(१) * ५२४९ श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शांतीसदन महिला वसतिगृहातून सहा महिलांनी व पनवेल (जि.रायगड) शहरातील बालगृहातून पाच मुलींनी पलायन केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महिला व बाल सुधारगृहामधून सातत्याने महिला व मुली पळून गेल्याच्या घटना घडत असून अनेक महिलांना व मुलींना शोधण्यात पोलिसांना यश आले असले तरी अद्याप अनेक महिला व मुली बेपत्ता असल्याने महिला व बालसुधारगृहांची सुरक्षा व व्यवस्थापनातील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन महिला व बालसुधारगृहात सुरक्षा व व्यवस्थापनामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) महिला व बाल सुधारगृहातील सुरक्षा व व्यवस्थापनातील त्रुटीवर आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच राज्यातील महिला वसतिगृहांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे १००% सुरक्षा रक्षकांची पदे भरण्यात आलेली आहेत.

याशिवाय महिला व बाल सुधारगृहातून महिला/मुली पळून गेल्या प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. महिलागृहाबाबत कर्मचाऱ्यांकडून कर्तव्यात कसूर झाल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, बाल सुधारगृहाबाबत भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये यासाठी सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलसंधारणाच्या कामांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन दोषींवर कारवाई करणेबाबत

**(२) * ५१९५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्हयांमध्ये जलसंधारण विभागांच्या अंतर्गत राबवित असलेल्या अनेक प्रकल्पांमध्ये हजारो कोटींचा गैरव्यवहार होत असून मौजे सारंगवाडी (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील संग्राहक तलाव या सर्वाधिक रक्कमेच्या प्रकल्पामध्ये शेकडो कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे तसेच वैभववाडी (जि.सिंधुदूर्ग) तालुक्याच्या अंतर्गत ऐनारी लघुपाटबंधारे तलाव या कामाची सन २००९-२०१० मधील मंजूर निविदा रुपये १० कोटींची असताना सदर प्रकल्पाचा खर्च ८० कोटींपर्यंत वाढवून गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही प्रकल्प श्रीराम असोसिएटस या कंपनीला सन २००९ मध्ये वा त्यासुमारास देण्यात आले असता या कंपनीने निविदा प्रक्रियेदरम्यान दहा डंपरच्या मालकीबाबत खोटी शपथपत्रे व इतर बनावट कागदपत्रे, आरसी बुक दाखल केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीचा ठेकेदार व पुणे, जलसंधारण विभागातील तत्कालीन तसेच सध्याचे अधिकारी यांच्या संगनमताने सदर गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सन २०२१ मध्ये पुच्छ कालवा संकल्पन व नदी खोलीकरण कामासाठी २.३८ कोटींची आवश्यकता असताना या कामासाठी तब्बल १२ कोटींचा वाढीव प्रस्ताव १२ जुलै, २०२१ मध्ये मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकल्पांचे काम देण्यात आलेल्या कंपनीच्या अखत्यारित असलेल्या राज्यातील जलसंधारणाची सर्व प्रकल्पाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेले ठेकेदार, जलसंधारण खात्याचे अधिकारी व इतर संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, अंशत: खरे आहे.

दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी सारंगवाडी संग्राहक तलावाच्या पुच्छ कालव्याच्या संकल्पन व नदी खोलीकरण कामासाठी रुपये १२.१२ कोटी चा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. या कामासाठी रुपये २.३८ कोटीची आवश्यकता होती हे म्हणणे खरे नाही.

(५) अ) मे.वॉटरफ्रंन्ट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने निविदा भरताना वाहनाची खोटी शपथपत्रे व इतर बनावट कागदपत्रे, आर सी बुक दाखल केलेली होती. विभागामार्फत रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दिली होती. तसेच तक्रारदाराने देखील वैभववाडी पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल केला होता.सद्य:स्थितीत पोलीस तपासाअंती कोर्टात चार्जशिट दाखल करण्यात आले आहे.

ब) तक्रारदाराने लोकायुक्त यांच्याकडे सुध्दा तक्रार केली होती. त्यावर लोकायुक्त यांनी सदर कंपनीवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने सदर कंपनीस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या कार्यकारी समितीने निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश दिले होते. तथापि, सदर कंपनीने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केली असता मा.उच्च न्यायालयाने याबाबत सक्षम स्तरावर कंपनीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देवून योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने कार्यकारी समितीने निविदा प्रक्रियेत भाग घेण्याची कंपनीवरील प्रतिबंध उठविण्याचा निर्णय घेतला आहे.

क) सदर कंपनीचा २००८ ते २०१४ या कालावधीतील राज्यातील प्रकल्पांची चौकशी पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांच्याअंतर्गत पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर यांच्यामार्फत सुरु आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशीच्या अनुषंगाने मागणी केलेले कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

ड) मे.वॉटरफ्रंन्ट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीला राज्यात मंजूर करण्यात आलेल्या योजनांपैकी मौजे सारंगवाडी संग्राहक तलाव व पुरसंरक्षक योजना ता.चिखली, जि.बुलढाणा या प्रकल्पाची कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण विभाग, अकोला यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. मौजे सारंगवाडी संग्राहक तलाव व पुरसंरक्षक योजना ता.चिखली, जि.बुलढाणा या प्रकल्पाची चौकशीमध्ये प्रकल्पावर करण्यात आलेली बहुतांश घटकांची कामे सर्वसाधारणपणे योग्य प्रकारे करण्यात आल्याचे दिसून आले. इतर कोणत्याही कामांची चौकशी गुणनियंत्रण विभागामार्फत सुरु अथवा प्रस्तावित करण्यात आलेली नाही..

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संत मुक्ताई मंदिर, कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३) * ५२५७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत मुक्ताई मंदिर कोथळी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव या ‘ब’ वर्ग तिर्थक्षेत्र मंदिर बांधकाम निधी मागणीचा दिनांक १४ जुलै, २०२३ रोजीचा प्रस्ताव हा नियोजन विभागाच्या दिनांक ४ जून, २०१५ रोजीचे शासन निर्णयानुसार पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांचे जिल्हास्तरीय समितीचे मान्यतेने सादर केला नसल्याने अद्यापही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत मुक्ताई मंदिर कोथळी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव या तीर्थक्षेत्राचे निधी मागणीचा प्रस्ताव विहित पध्दतीने सादर करणेकरीता मा.जिल्हाधिकारी जळगाव यांना दिनांक ३ जून, २०२५ रोजी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संत मुक्ताई मंदिर कोथळी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव या तीर्थक्षेत्राचे जीर्णोद्धारासाठी निधी मागणी प्रस्तावास मान्यता देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) श्री संत मुक्ताई मंदिर, कोथळी, ता.मुक्ताईनगर जि.जळगाव या तीर्थक्षेत्रास या विभागाकडून सन २०१८ मध्ये रुपये ९.०८ कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता देवून संपूर्ण निधी वितरीत केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग (उत्तर), जळगाव यांनी दिनांक १४ जुलै २०२३ रोजीच्या पत्राद्वारे सादर केलेला प्रस्ताव रुपये १५.०० कोटी रकमेचा असल्याने, सदर प्रस्ताव हा नियोजन विभागाच्या दिनांक ०४/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची मान्यता घेऊन सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे दिनांक ११/०२/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे संत मुक्ताई मंदिर कोथळी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव या तीर्थक्षेत्राचा प्रस्ताव विहीत पध्दतीने सादर करण्याचे जिल्हाधिकारी, जळगाव यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व आरोग्यवर्धिनी केंद्र पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत

**(४) * ४९३७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३४२ हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व ४०० पेक्षा जास्त आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू करण्याची घोषणा शासनाने केली होती यापैकी बहुतांश दवाखाने व आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू करण्यात आले नसल्याची तसेच सदर दवाखान्यांमध्ये फार्मसी पदवीधर व पदवीकाधारक यांची नियुक्ती करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात उक्त योजनेंतर्गत सुरु असलेल्या दवाखान्यात फॉर्मसी पदवीधारकांच्या कमरतेमुळे रुग्णांना औषधे देणे अडचणीचे होत आहे तसेच यापैकी अनेक दवाखाने बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही योजना प्रत्यक्षात पूर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी तसेच बंद दवाखाने पुन्हा सुरू करण्याच्या दृष्टीने फॉर्मसी पदवीधारकांच्या रिक्त जागा भरुन बंद असलेले दवाखाने तातडीने सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

राज्य शासनामार्फत ७०० हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व केंद्र शासनाच्या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून २२३२ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यापैकी आज रोजी ६०४ हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व १६४३ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.

सदरील हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यक्रम केंद्र शासनाच्या नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राच्या मार्गदर्शक सुचनेनुसारच राज्य शासना मार्फत कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार दोन्ही प्रकारच्या दवाखान्यामध्ये फार्मसी पदवीधर / पदवीधारक यांची पदे मंजूर नसून या आरोग्य संस्थांच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या / कार्यरत असणाऱ्या स्टाफ नर्स यांच्या द्वारे रुग्णांस औषधी देणे अपेक्षित आहे.
(२) हे खरे नाही.

सदरील दवाखान्यामध्ये औषध देण्यासाठी स्टाफ नर्स उपलब्ध आहेत. कोणतेही दवाखाने बंद असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.

-----------------

## राज्यातील परिचारिका प्रशिक्षणार्थी मुलींच्या वसतिगृहातील पुरुष वॉर्डनची नियुक्ती रद्द करण्याबाबत

**(५) * ५०३१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: नागपूर येथील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित असलेल्या अनेक जिल्ह्यांतील परिचारिका प्रशिक्षणार्थी मुलींच्या वसतिगृहात पुरुष वॉर्डन नियुक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास व समाजकल्याण विभागाच्या मुलींच्या वसतिगृहात केवळ महिला वॉर्डन असतानाही तसेच नर्सिंग कौन्सिल ऑफ इंडियाचा नियम डावलून आरोग्य विभागाने मुलींच्या वसतिगृहात पुरुष वॉर्डन नियुक्त करण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याप्रकरणी शंभरहून अधिक विद्यार्थिनीनींच्या पालकांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि आयुक्तांकडे पत्रे पाठवूनही कोणतीही दखल घेतली गेली नसून मुलींच्या सुरक्षेचा आणि मानसिक आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील नर्सिंग प्रशिक्षणार्थी मुलींच्या वसतिगृहात पुरुष वॉर्डन नियुक्त करण्यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे तसेच सदर मुलींच्या वसतिगृहात महिला वॉर्डनची नियुक्ती करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाशी संलग्न महिला वसतिगृहातील वॉर्डन या पदावरील नियुक्ती दिनांक १७ मार्च, १९६६ च्या सेवाप्रवेश नियमानुसार करण्यात येत असून सदर सेवाप्रवेश केवळ महिला उमेदवाराची भरती करण्यात यावी असे नमूद नसल्याने पुरूष वार्डनची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) व (४) भारतीय परिचर्या परिषदेच्या मानंकानुसार महिला वसतिगृहामध्ये महिला वॉर्डन आवश्यक असल्याने ज्या परिचारीका प्रशिक्षण विद्यालयाच्या वसतिगृहामध्ये पुरुष वॉर्डन कार्यरत आहेत अशा ठिकाणी वरिष्ठ वार्डन या पदाकरीता पात्र व जबाबदार महिला कर्मचाऱ्याची तात्पुरत्या/उसनवारी तत्वावर नेमणुक करणेबाबत सुचना उपसंचालक (शुश्रृषा) आरोग्य सेवा, मुंबई यांनी दिनांक १५/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व उपसंचालक परिमंडळे यांना दिल्या आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त ३५ महिला वसतिगृहांपैकी ३२ ठिकाणी महिला वॉर्डनची नियुक्ती करण्यात आली आहे. उर्वरित ३ ठिकाणी महिला वॉर्डनची नियुक्ती करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत वॉर्डन पदाचे दिनांक १७/०३/१९६६ च्या सेवाप्रवेश नियमांमध्ये भारतीय परिचर्या परिषदेच्या मानंकानुसार परिचारीका प्रशिक्षण विद्यालयाच्या वसतिगृहाकरीता वॉर्डन (स्त्री) अशी सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तांदूळवाडी (ता.वाळवा, जि.सांगली) येथील पाणीपुरवठा योजनेचे देयक प्रलंबित असल्याने ठेकेदाराने आत्महत्या केल्याबाबत

**(६) * ४८३३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तांदूळवाडी (ता.वाळवा, जि.सांगली) येथील ३५ वर्षीय कंत्राटदार हर्षल पाटील यांनी जलजीवन मिशनतंर्गत करण्यात आलेल्या नळपाणी योजनेच्या कामाच्या थकीत देयकाबाबत मागील वर्षभरापासून वारंवार शासनाकडे मागणी करूनही सदरहू थकीत देयक वेळेत न मिळाल्यामुळे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यभरातील सर्वच ठेकेदारांची ८९ हजार कोटी रुपयांची देयके प्रशासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मृत हर्षल पाटील व राज्यभरातील सर्वच ठेकेदारांची देयके प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच राज्यातील सर्वच ठेकेदारांची देयके अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

तांदूळवाडी (ता.वाळवा, जि.सांगली) येथील श्री.हर्षल पाटील यांचे नावे सांगली जिल्हा परिषद, पाणीपुरवठा विभागाकडून कोणत्याही कामाचा मक्ता देण्यात आलेला नाही.
(२) हे ही खरे नाही.

दिनांक १७/१०/२०२५ रोजी राज्यभरातील जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामांची सर्वच ठेकेदारांची सुमारे रुपये ७२६४.०० कोटी रुपयांची देयके अंमलबजावणी यंत्रणेकडे प्राप्त होती.
(३) व (४) श्री.हर्षल पाटील यांचे नावे सांगली जिल्हा परिषद, पाणीपुरवठा विभागाकडे कोणत्याही कामाचा मक्ता नसल्याने देयके प्रलंबित ठेवणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

जल जीवन मिशन अंतर्गत ऑक्टोबर, २०२४ पासून केंद्र शासनाचा हिस्सा अद्याप प्राप्त झालेला नाही. त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. केंद्र शासनाचा हिस्सा अप्राप्त असताना सन २०२४-२०२५ मध्ये राज्य शासनाने विशेष बाब म्हणून रुपये २४८३.५८ कोटी व सन २०२५-२०२६ मध्ये रुपये १८६३.२५ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणेस वितरीत केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील वैद्यकीय रूग्णालयात पाणी साचल्याने बालकांचा जीव धोक्यात आल्याबाबत

**(७) * ५७६१ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय / रूग्णालयातील लहान मुलांच्या अतिदक्षता विभागात (आय.सी.यु.) व वार्ड क्र.२५ मध्ये गुडघ्यापर्यंत पाणी साचल्यामुळे आजारी असलेल्या बालकांचा जीव धोक्यात असल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी प्रशासनाच्या आरोग्य व्यवस्थेतील निष्काळजीपणा समोर आला असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रुग्णालयामधील प्रशासनाच्या बेजबाबदार कामकाजाची चौकशी करून दोषी असलेल्या प्रशासकीय अधिकांऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०२५ मधील नागपूरातील अतिवृष्टीमुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील लहान मुलांच्या अतिदक्षता (आय.सी.यु.) विभागाबाहेर व वार्ड क्र. २५ परिसरात थोड्या प्रमाणात पाणी साचले होते. मात्र, रुग्णालय प्रशासनाने तत्काळ पाणी काढून टाकल्यामुळे बालकांच्या जीवाला कोणताही धोका निर्माण झाला नाही व रुग्णांची कोणतीही गैरसोय झाली नाही. त्यामुळे, आय.सी.यु. तील रुग्णांचा जीव धोक्यात आल्याची घटना खरी नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य महिला आयोगाला न्यायालयीन अधिकार देण्याबाबत

**(८) * ४६८७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महिला आयोगाकडे कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे पोलीस ठाण्याकडे पाठविण्यापुरतीच मर्यादित जबाबदारी असल्याने आणि या प्रकरणांचे न्यायिक किंवा तपासणीचे अधिकार नसल्यामुळे आयोगाला मर्यादित कार्यकक्षेत काम करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य महिला आयोगाचे सक्षमीकरण करून त्यांच्या अधिकारांमध्ये बदल व सुधारणा करून न्यायालयीन अधिकार देण्याचा विचार करावा अशी शिफारस विधिमंडळाच्या महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने राज्य शासनाला दिनांक २३ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिफारशीच्या अनुषंगाने राज्य महिला आयोगाला न्यायालयीन अधिकार देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ च्या कलम १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाची कामे विहीत करण्यात आली आहेत. त्यानुसार संविधान व अन्य कायदे यानुसार महिलांसाठी तरतुदी करण्यात आलेल्या संरक्षण उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे, स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी संरक्षण उपाययोजनांची अधिक परिणामकारक अंमलबजावणी करता यावी, यासाठी शासनास शिफारसी करणे तसेच राज्यात घडलेल्या पिडीत महिलांच्या प्रकरणांची स्वाधिकार दखल घेणे इत्यादी महत्वाच्या तरतुदी आहेत.

आयोगाला कलम १२ प्रमाणे प्रकरणाचा तपास करण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्याची व तपास अभिकरणाची सेवा वापरण्याचा अधिकार आहे. त्याप्रमाणे आयोगामार्फत कार्यवाही करण्यात येते.

(२) होय. अशी शिफारस महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी केली आहे.

(३) महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ च्या कलम १० (२) नुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगाला कोणत्याही बाबींचा तपास करताना खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेंतर्गत शासनाची फसवणूक केलेल्या अपात्र लाभार्थ्यांवर कारवाई करणेबाबत

**(९) * ५००५ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत २६ लाख ३४ हजार महिला लाभार्थी अपात्र असल्याचे व १४,२९८ पुरुषांनी सदर योजनेचा लाभ घेऊन शासनाची सुमारे २१ कोटी ४४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे तसेच ९५२६ शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी गेल्या १० महिन्यात १४.५० कोटी रुपये नियमबाह्य पध्दतीने या योजनेतून मिळविल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर योजनेत लाभार्थ्यांना दिले जाणारे मासिक मानधन १५०० रुपये वरून २१०० रुपये करण्याचे शासनाने घोषित करूनही प्रत्यक्षात मानधन वाढविण्याऐवजी या योजनेत नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करून लाभार्थ्यांची संख्या जाणीवपूर्वक कमी करण्यात येत असल्याने विविध महिला संघटना व लाभार्थी महिला योजनेच्या अंमलबजावणीविरोधात आंदोलन करित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची फसवणूक करणाऱ्या अपात्र महिला, पुरुष लाभार्थी व शासकीय महिला कर्मचाऱ्यांकडून फसवणुकीची रक्कम वसूल करण्याबाबत तसेच या योजनेतील अटी व शर्ती शिथिल करून सर्व पात्र महिलांना लाभ मिळावा यासाठी व योजनेचे मासिक मानधन १५०० रुपये वरून २१०० रुपये करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सदर योजनेसाठी गठीत केलेल्या जिल्हास्तरीय समित्यांनी चुकीचे प्रस्ताव मंजूर केल्याने त्या समित्यांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण" या योजनेंतर्गत नव्याने पात्रता/अपात्रतेच्या अटी व शर्ती समाविष्ट करण्यात आलेल्या नाही. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलेला थेट लाभ हस्तांतरणाव्दारे (Direct Benefit Transfer) दरमहा रुपये १,५००/- इतका आर्थिक लाभ देण्यात येत आहे.

(३) "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण"या योजनेचा सरकारी कर्मचाऱ्यांनी तसेच पुरुषांनी लाभ घेतल्याचे आढळल्यास त्यांचेकडून वसुली करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमातंर्गत आवश्यक ती कार्यवाही करुन त्यांचेकडून वसुली करण्याबाबत संबंधित विभागास कळविण्यात आले आहे.

तसेच “मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण” या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांचे स्वेच्छेने अथवा अन्य इतर कोणत्याही कारणाने वगळण्यात आलेल्या अथवा येणाऱ्या लाभार्थ्यांकडून आर्थिक लाभाच्या रक्कमेची सक्तीने वसुली न करण्याबाबतचा निर्णय मा.मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतंर्गत दुरवस्था झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) * ५७४२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे जिल्हा परिषदेच्याअंतर्गत असलेले सुमारे १०५ रस्ते खराब व १४ रस्ते पाण्याखाली गेल्याने त्यांचीही दूरवस्था झाल्याने येथील नागरिकांना रस्त्यावरुन जीवघेणा प्रवास करावा लागत असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता जिल्हा परिषदेने शासनाकडे निधीची मागणी केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिवृष्टी आणि महापुरामुळे पुन्हा अशा प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणती उपाययोजना केली आहे तसेच सोलापूर जिल्हा परिषदेकडील खराब झालेले १०५ रस्ते व पाण्याखाली गेलेले १४ रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता शासनाने निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) राज्यात माहे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीमध्ये अतिवृष्टी व पूरामुळे झालेल्या रस्त्यांच्या नुकसानीबाबत जिल्हा परिषदेकडून अहवाल प्राप्त झाला आहे. त्याआधारे, केंद्र शासनाकडे निधी मागणी करण्यासाठी प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागास पाठविला आहे. तसेच तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी वित्त विभागाकडे पुरवणी मागणी देखील सादर केली आहे. तद्नंतर निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच, अतिवृष्टीमुळे मोऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याने, भविष्यात पुनरावृत्ती टाळण्यासाठी मोऱ्यांच्या ठिकाणी बॉक्स कल्वर्ट अथवा लहान पूल घेण्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाणीपट्टी दरात केलेली वाढ पूर्ववत करणेबाबत

**(११) * ४९७६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलसंपदा विभागाकडून पाणीपट्टीत होत असलेली वाढ आणि विजेचा वाढलेला खर्च यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी) ने पाणीपट्टीत वाढ केली असून पाणीपट्टीचा सुधारित दर दिनांक १ सप्टेंबर, २०२५ पासून लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगांना विश्वासात न घेता तीन ते चार पटींनी अचानक वाढविलेली पाणीपट्टी ही अवास्तव असल्याने उद्योगांवर अन्यायकारक करणारी असून एमआयडीसीने केलेल्या वाढीचा विपरीत परिणाम उद्योगांवर होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेली अवास्तव पाणीपट्टीचे दर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) होय हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेच्या परिचालनासाठी होणाऱ्या खर्चापैकी वीज दर व पाणीपट्टी स्वामित्वधन हे घटक शासनाच्या संबंधित विभागास देय असणारे अनिवार्य वैधानिक शुल्क आहेत.

सन २०१३ पासून वीज व पाणीपट्टीच्या दरात साधारणतः अनुक्रमे ५३.६६% व ३१२.५०% वाढ झाली असली तरी उद्योगावर मोठ्या प्रमाणात बोजा पडू नये म्हणून फक्त सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मधील फक्त वीज दर व पाणीपट्टी स्वामित्वधन दरातील वाढीच्या अनुषंगाने पाणीपुरवठा योजनेवरील झालेला खर्च विचारात घेऊन महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील व औद्योगिक क्षेत्रा बाहेरील ग्राहकांना तसेच स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामपंचायती यांना पाणीपुरवठा करण्याकरीता पाण्याच्या दरात नाममात्र वाढ करण्यात येऊन दिनांक ०१/०९/२०२५ पासून पाण्याचे दर सुधारीत करण्यात आले आहेत.
(३) जलसंपदा विभागाने (MWRRA) त्यांचे दिनांक १९/०३/२०२२ च्या आदेशान्वये दिनांक ०१/०६/२०२२ पासून पाणीपट्टीचा दर ९०% वाढवून त्यानंतर प्रति वर्ष १० टक्के ची दरवाढ लागू केली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र वीज नियामक आयोग (MERC) यांच्या दिनांक ३०/०३/२०२० च्या आदेशान्वये वीज दरात वेगवेगळया प्रमाणात वाढ करण्यात आली असून, ही दरवाढ सरासरी १० टक्के प्रतिवर्षी एवढी आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेच्या एकूण देखभाल व दुरुस्तीच्या खर्चापैकी पाणी पट्टी स्वामित्व धनाचा खर्च व वीज देयका पोटीच्या खर्चाचा वाटा साधारण ६५ टक्केच्या दरम्यान आहे. पाणीपट्टी स्वामित्व धन, वीजपुरवठा व इतर परिचालन खर्च यांची वर्षनिहाय होणारी वाढ विचारात घेता होणारा योजनेवरील एकूण खर्च आणि प्रत्यक्षात जमा होणारा महसूल यामधील तफावत वाढत आहे. तथापि, महामंडळाने फक्त अनिवार्य वैधानिक शुल्क जसे पाणीपट्टी, स्वामित्व धन व वीजदरवाढ यातील वर्षनिहाय फरक विचारात घेऊन केलेली पाणीपट्टी दरवाढ ही अवास्तव नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हरिसाल (ता.धारणी, जि.अमरावती) गावातील पायाभूत सुविधांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१२)** * **५०४७ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील पहिले डिजिटल गाव म्हणून सन २०१६ मध्ये घोषीत करण्यात आलेल्या हरिसाल (ता.धारणी, जि.अमरावती) या गावात ग्रामपंचायत व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून स्वच्छ भारत अभियान योग्य प्रकारे राबविण्यात येत नसल्याने गावात वीज खांबावरील बंद दिवे, तुंबलेली गटारे, कचराकुंडीची दुर्गंधी, अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची देखभाल न होणे इ. बाबतच्या तक्रारी ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे करुनही या तक्रारीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीतील १५ व्या वित्त आयोगाचा निधी, करपट्टी, करवसूली, आठवडी बाजाराच्या ठेक्यातून वर्षाला २ लाख रुपयांचा निधी व अन्य निधी मोठ्या प्रमाणावर मिळूनही गावात स्वच्छतेचा अभाव आहे तसेच येथील ग्रामविकास अधिकारी आठवड्यातून फक्त एकच दिवस ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी करुन गाव स्वच्छ ठेवण्यासाठी व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी शासनाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नगर, श्रीगोंदा व कर्जत (जि.अहिल्यानगर) तालुक्यात ग्रामविकास विभागाच्या बनावट शासन आदेशान्वये केलेल्या कामांतील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१३)** * **४६९२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर, श्रीगोंदा व कर्जत (जि.अहिल्यानगर) तालुक्यांमध्ये ग्रामविकास विभागाचा बनावट आदेश तयार करुन विविध ठिकाणी सार्वजनिक बांधकामे, रस्ते व इतर नागरी सुविधांची कामे करण्यात आली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट आदेशावर प्रशासकीय अधिकाऱ्यांची स्वाक्षरी, शिक्के व कागदपत्रांचा वापर करून कामांचे आदेश दिल्याचे निदर्शनास आल्यामुळे शासनाच्या निधीवाटप प्रक्रिया व प्रशासकीय पारदर्शकतेसंदर्भात प्रश्न निर्माण झाल्याने सदर घटनांची चौकशी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या बनावट आदेशाच्या आधारे कामे करण्यात आलेली आहेत, त्या आदेशाची आणि निविदा प्रकाशित करण्यात आल्याची तारीख समान असल्यामुळे कामाच्या ठिकाणी जिल्हा परिषद बांधकाम विभागांतील जबाबदार अभियंत्यांनी भेट दिली नसल्याचे स्पष्ट होत असून, संबंधित अधिकारी हालचाल रजिस्टर उपलब्ध करून देत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बनावट आदेशांविषयी भूमिका स्पष्ट करताना संबंधित कामांच्या तपासणीस सहकार्य होत नसल्याने याबाबत चौकशी प्रक्रिया प्रलंबित असल्याच्या तक्रारी संबंधित कार्यालयांकडून प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर बनावट आदेशांच्या आधारे करण्यात आलेल्या कामकाजाच्या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२), (३), (४) व (५) माहे एप्रिल, २०२५ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या गावांतर्गत मूलभूत सोयीसुविधा या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यान्वयीन यंत्रणा असलेला बनावट आदेश निदर्शनास आलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांनी त्रयस्थ कार्यकारी अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून यासंदर्भात सदर अहवालाची शासन स्तरावर छाननी सुरु आहे.

दरम्यानच्या कालावधीत वरील बाब शासनाच्या निदर्शनास येताचक्षणी सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांनी शासन मान्यतेनुसार संबंधिताविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला असून याबाबत संबंधित पोलीसांमार्फत चौकशी सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेर (ता.जि.धुळे) येथील जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन तलावाच्या जमिनीचे बनावट दस्तावेज बनवून आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१४) * ५८८९ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेर (ता.जि.धुळे) गावाच्या ग्रामपंचायत हद्दीतील महाल लोंढा शिवारातील धुळे जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागाच्या मालकीच्या सुमारे २ लाख ४० हजार चौरस. फूट (६ एकर) शेतकऱ्यांच्या लघु सिंचन तलावाच्या जमिनीचे बनावट ग्रामपंचायत नमुना नंबर ८ कर आकारणी उतारा व गावठाण पत्राद्वारे धुळे उपनिबंधक कार्यालयाकडे दस्त क्र ५१५१/२०२४ दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ रोजी रितसर नोंदणीकृत बक्षीसपत्र नोंदवून सदर जमिनीचे हस्तांतरण केल्याबाबत जिल्हाधिकारी, धुळे व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, धुळे प्रशासनाकडे तक्रार दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने विस्तार अधिकारी, पंचायत समिती धुळे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केलेली असताना सदर प्रकरणाची चौकशी दाबण्याच्या हेतूने उक्त विस्तार अधिकारी हे सक्षम अधिकार नसताना विभागीय आयुक्तांचे अधिकार नियमबाह्य पध्दतीने वापरून त्यांनी दिनांक ०५/०८/२०२५ व दिनांक ०४/०९/२०२५ रोजी बेकायदेशीरपणे धुळे जिल्हा परिषद प्रशासनाने प्रतिनियुक्ती/तात्पुरते स्थानांतरण आदेश काढले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ०५/०८/२०२५ रोजीच्या उक्त विस्तार अधिकारांच्या आदेशाला स्थगिती दिल्यानंतर ते रितसर पदावर दिनांक २३/०९/२०२५ रोजी रुजू झाल्यानंतर त्यांनी दिनांक ०१/१०/२०२५ रोजी अंतिम चौकशी अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती धुळे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,धुळे यांना सादर केला असून सदर विस्तार अधिकारी, पंचायत समिती धुळे यांनी सादर केलेला दिनांक ०१/१०/२०२५ रोजीचा अंतिम चौकशी अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती,धुळे यांनी नाकारला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खुद्द प्रशासनाने नियुक्ती केलेल्या चौकशी अधिकारी यांच्या वतीने सादर केलेल्या चौकशी अहवाल नाकारण्याचे सक्षम कारण काय, तसेच सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, धुळे व पंचायत समिती धुळे प्रशासनाने दोषींवर फौजदारी कारवाई करून सदर हडप केलेली जमीन ताब्यात घेणेबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रशासकीय कार्यवाहीस दिरंगाई करणाऱ्या व जिल्हा परिषदेच्या शासकीय जमिनी सांभाळण्याची मालमत्ता अधिकारी म्हणून सक्षम जबाबदार असलेल्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग व गटविकास अधिकारी पंचायत समिती धुळे यांच्यावर विभागीय चौकशीची शासानाने कारवाई केली आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, सदर प्रकरणात चौकशी अधिकारी म्हणून नेमण्यात आलेले विस्तार अधिकारी, (ग्रा.पं.), पंचायत समिती, धुळे यांच्या वर्तणुकीबाबत तक्रार प्राप्त झाल्याने त्या तक्रारीची शहानिशा करावी या उद्देशाने तात्पुरत्या स्वरूपात स्थानांतरण करण्यात आले होते.
(३) व (४) हे खरे नाही.

सदर विस्तार अधिकारी यांना दिनांक ०५/०८/२०२५ रोजी कार्यमुक्त केल्यानंतर ते बदलीच्या ठिकाणी पंचायत समिती, शिंदखेडा येथे हजर न होता रजेवर गेले. मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या बदलीस स्थगिती दिल्यामुळे त्यांना दिनांक १८/०९/२०२५ रोजी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, धुळे येथे हजर होण्यासंदर्भात आदेशित केले असताना ते परस्पर पंचायत समिती, धुळे येथे हजर झाले आहेत. अशाप्रकारे त्यांची विस्तार अधिकारी, पंचायत समिती, धुळे येथे नियुक्ती झालेली नसल्याने या पदावरून त्यांनी सादर केलेला अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे यांनी परत केला आहे. तथापि, या अहवालाची प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत पडताळणी करून मूळ चौकशी अहवाल व पडताळणी समितीच्या अहवालानुसार संबंधित दोषींविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी दिले आहेत व त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मेळघाट (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील गर्भवती माता मृत्यू रोखण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(१५) * ५४२५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथे कुपोषण आणि बालमृत्यूचे अधिक प्रमाण असल्यामुळे गर्भवती महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे असतानाही रुग्णवाहिका वेळेवर न आल्याने घरगुती उपचारामुळे अवघ्या १५ दिवसांत तीन गर्भवती मातांचा घरीच प्रसुतीदरम्यान मृत्यू झाला असून मेळघाटात आतापर्यंत सुमारे ३,५५१ महिला गर्भवती असल्याची बाब दिनांक ५ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटातील तीन गर्भवती मातांचा रुग्णवाहिका वेळेवर न प्राप्त झाल्यामुळे त्यांच्या मृत्यू झाल्याप्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली तसेच मेळघाटातील माता मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी व गर्भवती मातांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी त्यांना वेळेवर रुग्णवाहिका व इतर वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

सप्टेंबर- ऑक्टोबर, २०२५ मध्ये ३ स्तनदा मातांचा मृत्यू झाला आहे. रुग्णवाहिकेअभावी मृत्यू झाल्याची बाब खरी नाही. यासंदर्भात तीनही प्रकरणी चौकशी करण्यात आली असून दोन प्रकरणात कोणीही दोषी आढळून आले नसून एका प्रकरणात दोषींवर कारवाई करण्यात आली आहे.

माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२५ या काळात ४०२१ नवीन गरोदर मातांची नोंदणी झाली आहे. एकूण ३७, २६० बालकांपैकी १३२ सॅम (अतितीव्र कुपोषित) आणि १७६६ मॅम (मध्यम तीव्र कुपोषित) बालके आहेत. कुपोषित बालकांवर प्राथमिक आरोग्य केंद्र (बाल उपचार केंद्र) आणि एन. आर. सी. मध्ये वेळोवेळी उपचार केले जातात.

मेळघाटात आरोग्य संस्थांमार्फत आरोग्य विभाग व महिला व बालविकास विभागामार्फत माता मृत्यू कमी करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त माता व बालकांच्या पोषणासंबंधित योजना, एकात्मिक बालविकास योजनेमार्फत राबविल्या जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट असलेल्या २३ गावांमधील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे यांचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याबाबत

**(१६) * ५८८१ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या २३ गावांतील ग्रामीण रुग्णालय, आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झाले नसल्याने त्या गावातील नागरिकांना आरोग्य केंद्रामधून सर्वसामान्यांना दिले जाणारे उपचार बंद झालेले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य केंद्राच्या इमारती महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याने पालिकेच्या आरोग्य विभागाकडून अद्यापही वैद्यकीय सेवा सुरू केलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावांमधील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या जागा व इमारती तसेच प्राथमिक शाळांच्या हस्तांतरापोटी पुणे जिल्हा परिषदेने महानगरपालिका प्रशासनाकडे सुमारे १०० कोटीचा निधी वर्ग करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी करून नागरिकांना वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही,

संबंधित गावातील नागरिकांना आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पुणे मार्फ़त नियमितपणे आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे. तथापि, ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १८ उपकेंद्रे स्थलांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु असून रुग्णांना पूर्वीच्याच ठिकाणी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पुणे मार्फ़त वैद्यकीय सेवा पुरविली जात आहे.
(३) हस्तांतरीत करावयाच्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारतींचे मूल्यांकन म्हणून रुपये १३६.०८ कोटी इतका निधी वर्ग करण्याबाबत इतके मूल्यांकन येत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी पुणे महानगरपालिकेस कळविले आहे.
(४) व (५) सद्य:स्थितीत जिल्हा परिषदेमार्फ़त पूर्वीच्या आरोग्य संस्थांमध्ये नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येत असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली व पुणे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये प्रतिबंधात्मक लसींचा पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७)** * **५४९४ श्री.अमित गोरखे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये 'अ' जीवनसत्व आणि रेबीज प्रतिबंधक लसीचा तुटवडा निर्माण झाला असल्याची तसेच पुणे जिल्ह्यातील भोर उपजिल्हा रुग्णालय तसेच राजगड व मुळशी परिसरात ॲन्टी-रेबीज सीरम उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लसीचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून सांगली जिल्ह्यासह पुणे जिल्ह्यातील भोर, राजगड व मुळशी या तीन तालुक्यांतील रुग्णालयांना ॲन्टी-रेबीज सीरमचा पुरवठा, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये 'अ' जीवनसत्व आणि रेबीज प्रतिबंधक लसीचा पुरवठा तात्काळ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) सन २०२४-२५ मध्ये 'अ' जीवनसत्वाची राज्य स्तरावरुन खरेदी करण्यात आली असून ऑगस्ट २०२५ मध्ये सर्व जिल्हयांना वाटप करण्यात आले आहे.

सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक ०५/०८/२०२५ रोजी अ जीवनसत्वाचा शासकीय स्तरावरून पुरवठा करण्यात आला आहे.
सांगली जिल्ह्यामध्ये शासन स्तरावरुन ॲन्टी रेबीजचा पुरवठा करण्यात आला असून, एप्रिल २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये उक्त लसीचा तुटवडा निर्माण झाला नाही.

अ) जिल्हा रुग्णालय, पुणे येथील औषध भांडारामध्ये ॲन्टी रेबिज सिरम या लशीचा काही काळापुरता तुटवडा निर्माण झाला असल्यामुळे अधिपत्याखालील सर्व रुग्णालयांना स्थानिक स्तरावरील उपलब्ध निधीमधून आवश्यक औषधीचा पुरवठा खरेदी करुन पुरविण्यात यावे, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ब) सदयःस्थितीत ई औषधी प्रणालीचे अवलोकन केले असता, पुणे आणि सांगली जिल्ह्यामध्ये व्हिटॅमिन ए, एआरव्ही आणि एआरएस चा साठा उपलब्ध असल्याचे दिसून येते.

पुणे जिल्ह्यामध्ये जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त होणाऱ्या जिल्हा वार्षिक योजनेतील अनुदानातून ॲन्टी रेबीज सीरम दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय/अनुदानित व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा आरक्षित न ठेवल्यामुळे पात्र उमेदवारांना प्रवेश नाकारण्यात आल्याबाबत

**(१८) * ४८५० श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत २३ पेक्षा अधिक शासकीय/अनुदानित व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ३२१९ पेक्षा अधिक एम.बी.बी.एस. च्या जागा असून एस.सी., एस.टी. ओ.बी.सी. व व्ही.जे.एन.टी. या मागासवर्गीय प्रवर्गासाठी १५३३ पेक्षा अधिक जागा राखीव न ठेवल्यामुळे सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रियेदरम्यान आरक्षणाची टक्केवारीनुसार पात्र विद्यार्थी असताना सुध्दा मोठ्या प्रमाणात राखीव जागा इतरत्र वळविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून पात्र विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय दूर करण्याच्या दृष्टीने कोणती आवश्यक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

राज्यात एकूण ४२ शासकीय / अनुदानित वैद्यकीय महाविद्यालये व एकूण २५ खाजगी वैद्यकीय महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालयांतील प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत ८५ टक्के राज्य कोट्यांतर्गत केले जातात. त्याअंतर्गत सदर शासकीय / अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांत विद्यार्थी प्रवेशासाठी दिनांक २९/०१/२०१८ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार राज्य कोट्याच्या ५० टक्के घटनात्मक आरक्षण व विभागाच्या दिनांक २४/०६/२००६ रोजीच्या अधिसूचनेन्वये खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मंजूर प्रवेश संख्येच्या २५ टक्के जागा राखीव प्रवर्गासाठी आरक्षित आहेत.

| एमबीबीएस | एकूण जागा | राखीव प्रवर्गासाठी तरतुदीनुसार जागा | वास्तविक जागा |
|---|---|---|---|
| शासकीय | ४९३६ | २४६७ | २४६७ |
| खाजगी (२५ टक्के) | ३४४९ | ८६२ | ८६२ |
| एकूण | ८३८५ | ३३२९ | ३३२९ |

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यात कोरोना कालावधीत उभारलेल्या ऑक्सिजन प्लांटची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत

**(१९) * ५१२६ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२१ मध्ये कोरोना साथीच्या कालावधीत पवनी तालुक्यासह भंडारा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेले ऑक्सिजन प्लांट सध्या निष्क्रिय अवस्थेत असल्याने सदर प्लांट उभारणीसाठी पवनी तालुक्यातील रुपये २ कोटीसह इतर तालुक्यांतील एकूण खर्च वाया गेला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पवनी, तिरोडा, लखांदूर, लाखनी, साकोली व मोहाडी तालुक्यांतील प्लांट गेल्या वर्षभरापासून बंद पडले असल्याने भविष्यातील आपत्कालीन परिस्थितीत ऑक्सिजन तुटवड्याचा गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, तसेच प्लांटच्या उभारणीसाठी जिल्ह्यात एकूण किती कोटी रुपयांचा शासकीय निधी खर्च झाला आहे, याची तपशीलवार माहिती शासनाकडे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ऑक्सिजन प्लांट तांत्रिकदृष्ट्या कार्यक्षम असूनही त्यांचे देखभाल व संचालनासाठी आवश्यक २०० केव्ही जनरेटर खरेदी न झाल्याने व वीजपुरवठा तसेच तांत्रिक मनुष्यबळाच्या अभावामुळे ते वापरात नसल्याने बंद झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार विभाग, अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली व सदरहू ऑक्सिजन प्लांट कार्यक्षम करुन देखभाल दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत भंडारा जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय भंडारा, उपजिल्हा रुग्णालय तुमसर व साकोली, ग्रामीण रुग्णालय पवनी, लाखनी, लाखांदूर व मोहाडी येथील ऑक्सीजन PSA Plant चालू अवस्थेत असून प्लांटच्या चाचणीसाठी दि २२ ते २५ सप्टेबर २०२५ दरम्यान केंद्र शासनाच्या निर्देशानुसार Mock Drill ची आठवी फेरी घेण्यात आली आहे.

कोविड कालावधीत प्लांटमधून ऑक्सीजनची निर्मिती झालेली आहे. कोविड साथरोग आटोक्यात आल्याने कोविड रुग्ण अभावी ऑक्सीजनची अधिक प्रमाणात गरज भासत नाही. सध्या आवश्यकतेनुसार Oxygen Cylinder मार्फत आवश्यक ऑक्सीजनची पुर्तता होत असल्याने PSA Plant चा वापर केला जात नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

गोंदिया जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय तिरोडा येथील ऑक्सीजन PSA Plant केंद्र शासनाकडून PM Care अंतर्गत प्राप्त झालेला असून तांत्रिक कारणामुळे बंद अवस्थेत आहे. सदर PSA प्लांट Core Energy Systems Pvt ltd मार्फत दुरुस्तीची प्रक्रिया सुरु आहे.

भंडारा जिल्ह्यातील ऑक्सीजन PSA प्लांटच्या उभारणीसाठी रुपये ७४९.५२ लक्ष इतका निधी खर्च झाला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही. राज्यस्तरावरून ऑक्सीजन प्लांटच्या देखभाल व दुरुस्तीसंदर्भात निविदा प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## भांबेरी (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीच्या घरकुल योजनेंतर्गत झालेल्या कामांमधील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२०) * ५६४९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांबेरी (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथील ग्रामपंचायत व अन्य ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यात आलेला घरकूल योजनेतंर्गत पात्र महिला लाभार्थी जिवंत असतानाही त्यांना मयत दाखविण्यात आल्याचे तसेच रोजगारानिमित्त बाहेरगावी गेलेल्या अन्य पात्र लाभार्थीची नावे यादीतून वगळण्यात येऊन त्यासंदर्भातील ठराव सरपंच, उपसरपंच वा अन्य सदस्यांशिवाय मंजूर करण्यात येऊन सदर ठरावावर नियमित

ग्रामसेवकांऐवजी लिपिक यांची स्वाक्षरी घेण्यात आल्याची बाब दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतीसाठी आवश्यक असणारे ठराव बुक, कर वसुली बुक आदी महत्वाचे दस्तऐवज उपलब्ध नसून संबंधित ग्रामसेवक यांच्यावर तेथील सामाजिक कार्यकर्त्यांनी घरकूल मंजुरीसाठी पैसे घेणे, विविध योजनांच्या फाईलीवर सहीसाठी लाच मागणे, कर वसुली निधीचा अपहार करणे तसेच बनावट ८-अ देत असल्याबाबत आरोप केल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सरपंच तसेच उपसरंपच, ग्रामपंचायत भांबेरी, ता.तेल्हारा यांनी त्याबाबत चौकशी करुन कारवाई करण्याबाबत शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी अभिलेखाची तपासणी केली असता उप सरपंच यांचे घरकुल प्रकरणी ग्रामसेवक हे आर्थिक त्रास देत असल्याचे निवेदन प्राप्त झालेले दिसून येते.

(४) ग्रा.पं.भांबेरी ता.तेल्हारा येथील ग्रामपंचायत अधिकारी हे घरकुल प्रकरणी दोषी आढळल्यामुळे त्यांची म.जि.प.जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ च्या तरतुदीनुसार एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती थांबविण्यात आली आहे व ग्रामपंचायत कर्मचारी यांचे विरुध्द म.ग्रा.पं.अधिनियम १९५९ चे कलम ६१ नुसार- ग्रामपंचायत ठराव क्र.५ दिनांक १७/११/२०२५ नुसार सेवेतुन निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठीच्या निकृष्ट दर्जाच्या औषध खरेदीची चौकशी करणेबाबत

**(२१) * ५६१२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी हाफकिन बायो फार्मासिस्ट कार्पोरेशनच्या पुरवठा विभागाने दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केलेल्या जवळपास २ कोटी १२ लाख रूपयांच्या औषध खरेदीत अनियमितता झाल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी राज्य विमा निगम (ईएसआयसी) ने माहे डिसेंबर, २०२४ मध्ये प्रतिबंधित आणि निकृष्ट दर्जाचे घोषित केलेल्या औषधांचा या खरेदीमध्ये समावेश असल्याने, हाफकिनने केलेल्या सदर खरेदीमुळे औषध खरेदी संदर्भातील मूलभूत नियम, कायद्यांचे उल्लंघन झाल्याचे आणि रूग्णांच्या आरोग्याच्या सुरक्षेची दक्षता घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाच्या औषधांचा पुरवठा कोणकोणत्या रूग्णालयांना करण्यात आलेला असून, सदरहू निकृष्ट दर्जाची औषधे संबंधित रूग्णालयांकडून परत घेण्यात आली आहेत काय तसेच हाफकिन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लिमिटेड या संस्थेच्या औषध खरेदी विभागाचे मागील पाच वर्षांतील लेखापरीक्षण (Audit) केव्हा करण्यात आले आहे व त्या अहवालांमध्ये कोणत्या अनियमितता आढळून आल्या आहेत,

(४) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या निकृष्ट औषध खरेदीच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शासनाने औषध खरेदी व वितरण प्रक्रियेत बदल, नियंत्रण यंत्रणा किंवा नवे धोरण तयार करण्याबाबत तसेच निकृष्ट दर्जाच्या औषध पुरवठ्यामुळे शासनाचे व रूग्णांचे झालेले नुकसान पाहता सदरहू नुकसानभरपाई संबंधित कंपनीकडून वसूल करण्याबाबत तसेच हाफकिनचे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) नाही. तथापि, दिनांक १४/०२/२०२५ रोजी कर्मचारी राज्य विमा निगम (ईएसआयसी) च्या वैध दरकराराच्या अटी शर्तींना अधीन राहून औषध खरेदी करण्यात आली आहे. या खरेदी मधील औषधे प्रतिबंधित आणि निकृष्ट दर्जाचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नवउद्योजकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवनू देण्याकरिताच्या अटी रद्द करणेबाबत

**(२२) * ४७६९ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या ‘स्टार्टअप इंडिया’ आणि राज्य शासनाच्या ‘रोजगार निर्मिती’ योजनांमध्ये ‘निव्वळ संपत्ती’ ची अट नसताना एमआयडीसीने व उद्योग विभागाने ‘नवउद्योजक’ (Start-up) यांना भूखंड वाटप आणि शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ‘निव्वळ संपत्ती’ (Net Worth) प्रमाणपत्र सादर करण्याची अट बंधनकारक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावे सुरु असलेल्या २० टक्के भूखंड राखीव योजनेतून गेल्या तीन वर्षांत अनेक अनुसूचित जाती/जमातीच्या नवउद्योजकांना ‘निव्वळ संपत्ती’ ची अट पूर्ण न करू शकल्यामुळे अपात्र ठरविण्यात आले असून, या वंचित राहिलेल्या उद्योजकांना भरपाई किंवा पर्यायी संधी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवउद्योजकांना भूखंड वाटपासाठी निव्वळ संपत्ती ऐवजी त्यांच्या तांत्रिक कल्पनेची व्यवहार्यता (Viability), उद्योग उभारणीचा आराखडा (Project Report) किंवा नोंदणीकृत बौद्धिक संपदा (IPR/Patent) यावर आधारित सोपे व उद्योजक-स्नेही निकष लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही

केली तसेच ‘निव्वळ संपत्ती’ ची अट नसतानाही नव उद्योजकांना शासकीय योजनांचा लाभ देण्याकरीता सदर अट बंधनकारक करण्याच्या विसंगतीस जबाबदार असलेल्या उद्योग विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेमध्ये नव उद्योजकांचे स्वभांडवल असावे अशी अट आहे. मऔवि महामंडळाने उद्योजकांना भूखंड/शेड/गाळा वाटपाबाबत परिपत्रक क्र. डी-४२३१६,, दिनांक १३/१०/२०२२ अन्वये धोरण पारित केले असून, त्यामध्ये भूखंड वाटप करतेवेळी उद्योग उभारणीसाठी उद्योजकांची आर्थिक सक्षमता पडताळणी करण्यासाठी निव्वळ संपत्ती (Net-worth) ची अट नमूद केलेली आहे.

तसेच दिनांक १७/१०/२०२५ परिपत्रका अन्वये MILAAP धोरण निर्गमित केले असून, सदर धोरणा अंतर्गत Start-up योजनेसाठी वेगळ्या अटी व शर्ती नमूद नसून उद्योजकांना भुखंड वाटप करण्यासाठी परिशिष्ट-१ मध्ये मुद्दा क्र. १२ नुसार Means of Finance: Equity (Rupees/FDI), Term Loan, ECB, Unsecured Loan, Internal Cash Accruals etc. (including details of financial credibility of the promoter with Net worth certificate issued by C.A.) असे नमूद केले आहे.

राज्य सरकारच्या रोजगार निर्मीती योजना या भांडवल उभारणीसाठीच्या योजना आहेत. मऔवि महामंडळाकडून भूखंड वाटप करतेवेळी भूखंडाची शुल्क आकारणी पूर्णतः लाभार्थ्याकडून होते. तसेच सदर भूखंडाचा विकास कालावधीत विकास होऊन भूखंडावर रोजगार निर्मीतीस चालना मिळावी या हेतूने अर्जदार घटकाची आर्थिक सक्षमता तपासली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयातील गैरव्यवहार प्रकरणी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * ५५६५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रुबी हॉल क्लिनिक (जि.पुणे) मध्ये सन २०२२ मध्ये झालेल्या किडनी रॅकेटसंदर्भात चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने जवळपास तीन वर्षांचा कालावधी होऊनही अद्याप आपला अहवाल शासनास सादर केला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने सदर अहवाल अद्याप सादर न करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून त्यानुषंगाने सदर किडनी रॅकेटमधील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.
(२) किडनी रॅकेट संबंधित सदरची चौकशी विस्तृत व मोठ्या स्वरुपाची असल्याने आणि चौकशी व उलटतपासणी पूर्ण करुन अंतिम चौकशी अहवाल तयार करण्यास काही कालावधी लागत असल्यामुळे चौकशी समितीने चौकशी अहवाल सादर केलेला नाही. तथापि, सद्य:स्थितीत चौकशी पूर्ण झालेली असून चौकशी अहवाल अंतिम करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर चौकशीमध्ये दोषी आढळलेल्यां विरुध्द कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कोतवाल (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथील लघुपाटबंधारे योजनेची निविदा रद्द करुन सदर कामाची फेरनिविदा काढण्याबाबत

**(२४) * ५४५५ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोतवाल (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथील मृद व जलसंधारण विभागाच्या रुपये ९९.६४ कोटीच्या लघुपाटबंधारे योजनेस दिनांक ३० ऑगस्ट, २०११ मध्ये वा त्यासुमारास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येऊन सन २०१२-१३ मध्ये सदर कामाची निविदा मे.वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन, पुणे यांना देण्यात आली होती तथापि, मागील १३ ते १४ वर्षांपासून या कंत्राटदाराने काम सुरु केले नसल्याचे माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे.वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन कंपनीने संपूर्ण राज्यात मृद व जलसंधारण विभागामार्फत अंदाजे २० योजनांची कामे हाती घेऊन एकही योजना पूर्ण केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाची निविदा रद्द करुन फेरनिविदा काढण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निविदा रद्द करुन फेरनिविदा काढण्याबाबत कोणती कार्यवाही तसेच योजनेच्या कामाच्या विलंबास जबाबदार असणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

मे. वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन कंपनी मार्फत २० कामांपैकी ०४ कामे रद्द केली असून १६ कामे प्रगतीपथावर/चालू आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) कोतवाल ता.पोलादपूर, जि.रायगड या योजनेचा भूसंपादन दर निश्चित करण्यात आलेला होता.परंतु स्थानिक शेतकऱ्यांना अमान्य असल्याने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय काम करण्यास स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. दिनांक ५/०६/२०२४ रोजी जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी कार्यस्थळाला भेट देवून प्रकल्पग्रस्तांसोबत चर्चा करुन शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. दोन्ही गावांतील प्रकल्पग्रस्तांची एकत्र बैठक घेवून त्यांची संमती घेण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. तथापि, शेतकऱ्यांची संमतीपत्र अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाहीत.

-----------------

## राज्यातील विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२५) * ४७१९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बांधकाम कामगार हे विविध कल्याणकारी योजनांपासून वंचित राहत असून, त्यांच्या अनेक समस्या देखील प्रलंबित आहेत, त्यामुळे बांधकाम कामगारांच्या मागण्या पूर्ण न झाल्यामुळे संतप्त झालेल्या राज्यातील लाखो बांधकाम कामगारांनी दिनांक २८ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे आक्रोश मोर्चा काढला असून या मोर्चात कामगारांनी त्यांच्या हक्कांसाठी आणि शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी निदर्शने केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम कामगारांनी एफ-०२ (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजना) या महत्त्वपूर्ण योजनेत सर्व कामगारांची नोंदणी करून सदर योजना सर्व बांधकाम कामगारांना लागू करण्याबाबत तसेच त्यांना वैद्यकीय सुविधा, स्वतंत्र पोर्टल, घरकुले प्राधान्यांनी मिळावीत अशा विविध मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम कामगारांच्या उक्त मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य श्रमिक बांधकाम कामगार कृती समिती, कोल्हापूर या श्रमिक संघ अधिनियम, १९२६ अंतर्गत नोंदणीकृत नसलेल्या संघटनेमार्फत दिनांक २८/०७/२०२५ रोजी कोल्हापूर शहरामध्ये मोर्चा काढण्यात आला. त्याबाबत संघटनेने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दिलेल्या निवेदनामध्ये नोंदीत बांधकाम कामगारांचा मृत्यू झाल्यास वारसास अर्थसहाय्य रुपये २ लाख रूपये (योजना एफ-०२), वैद्यकीय सुविधा, स्वतंत्र पोर्टल, घरकुल योजना याबाबतच्या मागण्यांचा समावेश आहे.

(३) महाराष्ट्र राज्य श्रमिक बांधकाम कामगार कृती समिती, कोल्हापूर यांच्या दिनांक २८/०७/२०२५ रोजीच्या निवेदनातील मागण्यांबाबत सहायक कामगार आयुक्त, कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडून दिनांक २१/०८/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत निवेदनातील सर्व मुद्दयांवर चर्चा करण्यात आली. तसेच मंडळाच्या योजना क्र.एफ-०२ बाबतचे अर्ज निकाली काढल्याचे संबंधितांना अवगत केले. मंडळाच्या तपासणी ते उपचार आरोग्य तपासणी योजनेंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात वैद्यकीय सुविधा देणाऱ्या सूचिबध्द रुग्णालयांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना त्वरीत उपचार देण्याबाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या. तसेच अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) बाबत प्रलंबित सर्व अर्जांची पडताळणी केल्याचे संबंधितांना अवगत केले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कुष्ठरोग रुग्णांची संख्या कमी करण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(२६) * ५१५० श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२२ ते २०२५ या तीन वर्षांच्या कालावधीत कुष्ठरोग रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असून सद्य:स्थितीत राज्यात १४,१७५ कुष्ठरोग रुग्णांची नोंद करण्यात आल्याचे व सदर आजाराचे मुलांमधील प्रमाण ३.४० टक्के इतके असून अनेक स्तरांवर प्रयत्न करुनही शून्य रुग्णसंख्येचे उद्दिष्ट अद्याप साध्य न झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उदिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय तज्ज्ञ, सल्लागार, आजार निदान व उपचारासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची कमतरता असल्यामुळे कुष्ठरोगाचे प्रमाणाचे निश्चित मोजमाप होत नसून मोठ्या प्रमाणात रुग्ण वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या कुष्ठरोग रुग्णांची संख्या विचारात घेता त्यांच्यावर तातडीने उपचार करुन त्यांची संख्या शुन्यावर आणण्यासाठी तसेच याकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग व तसेच आवश्यक औषधे उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.

माहे एप्रिल, २०२५ अखेर १४१७५ कुष्ठरुग्ण बहुविध औषधोपचाराखाली होते. माहे एप्रिल, २०२५ मध्ये १२६३ नवीन कुष्ठरुग्णांची नोंद झाली असून यामध्ये ३.४० टक्के (४३ मुले) इतके मुलांचे प्रमाण आहे.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाचे सर्वसाधारण आरोग्य सेवेमध्ये एकत्रिकरण झाले असून राज्यात हा कार्यक्रम राज्य शासन, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि स्वयंसेवी संस्था यांच्या अधिपत्याखालील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे

वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची कमतरता नाही. तसेच, नियमित व विशेष मोहिमेद्वारे कुष्ठरुग्णांच्या लक्षणांच्या आधारे शोध घेऊन त्यांना उपचाराखाली आणले जात असल्याने सर्व कुष्ठरुग्णांचे निश्चित मोजमाप होत आहे.

(३) शासनाकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) राज्याने दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पासून साथरोग अधिनियम अंतर्गत कुष्ठरोग हा "अधिसूचित आजार" म्हणून घोषित केला आहे. या अधिसूचनेनुसार राज्यातील सर्व शासकीय, खाजगी, अशासकीय संस्था, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांनी निदान झालेल्या सर्व कुष्ठरुग्णांचे अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक केले असल्याने यापुढे सर्व कुष्ठरुग्णांची नोंदणी शासनाकडे होईल.

२) सन २०२५-२६ मध्ये राज्यातील सर्व ३५ जिल्ह्यात कुष्ठरोग शोध अभियान दिनांक १७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर, २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अभियानात सुमारे ८.६६ कोटी लोकसंख्येची आशा व पुरुष स्वयंसेवक यांच्या पथकाद्वारे तपासणी करण्यात येत आहे.

तपासणीमध्ये आढळून आलेल्या सर्व संशयितांची वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत तपासणी करुन निदान निश्चित झालेल्या सर्व कुष्ठरुग्णांना तात्काळ बहुविध औषधोपचार सुरु करण्यात येत आहे.

३) कुष्ठरोग शोध अभियान, स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान, कुसुम मोहिम इ. विविध मोहिमा व अभियानाद्वारे समाजातील सर्व कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित औषधोपचाराखाली आणले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, अंशत: खरे आहे.

दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी सारंगवाडी संग्राहक तलावाच्या पुच्छ कालव्याच्या संकल्पन व नदी खोलीकरण कामासाठी रुपये १२.१२ कोटी चा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. या कामासाठी रुपये २.३८ कोटीची आवश्यकता होती हे म्हणणे खरे नाही.

(५) अ) मे.वॉटरफ्रंन्ट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने निविदा भरताना वाहनाची खोटी शपथपत्रे व इतर बनावट कागदपत्रे, आर सी बुक दाखल केलेली होती. विभागामार्फत रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दिली होती. तसेच तक्रारदाराने देखील वैभववाडी पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल केला होता.सद्य:स्थितीत पोलीस तपासाअंती कोर्टात चार्जशिट दाखल करण्यात आले आहे.

ब) तक्रारदाराने लोकायुक्त यांच्याकडे सुध्दा तक्रार केली होती. त्यावर लोकायुक्त यांनी सदर कंपनीवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने सदर कंपनीस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या कार्यकारी समितीने निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश दिले होते. तथापि, सदर कंपनीने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केली असता मा.उच्च न्यायालयाने याबाबत सक्षम स्तरावर कंपनीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देवून योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने कार्यकारी समितीने निविदा प्रक्रियेत भाग घेण्याची कंपनीवरील प्रतिबंध उठविण्याचा निर्णय घेतला आहे.

क) सदर कंपनीचा २००८ ते २०१४ या कालावधीतील राज्यातील प्रकल्पांची चौकशी पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांच्याअंतर्गत पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर यांच्यामार्फत सुरु आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशीच्या अनुषंगाने मागणी केलेले कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

ड) मे.वॉटरफ्रंन्ट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीला राज्यात मंजूर करण्यात आलेल्या योजनांपैकी मौजे सारंगवाडी संग्राहक तलाव व पुरसंरक्षक योजना ता.चिखली, जि.बुलढाणा या प्रकल्पाची कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण विभाग, अकोला यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. मौजे सारंगवाडी संग्राहक तलाव व पुरसंरक्षक योजना ता.चिखली, जि.बुलढाणा या प्रकल्पाची चौकशीमध्ये प्रकल्पावर करण्यात आलेली बहुतांश घटकांची कामे सर्वसाधारणपणे योग्य प्रकारे करण्यात आल्याचे दिसून आले. इतर कोणत्याही कामांची चौकशी गुणनियंत्रण विभागामार्फत सुरु अथवा प्रस्तावित करण्यात आलेली नाही..

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामपंचायतींकरीता घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७)** * **४६७८ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील फक्त तीन ग्रामपंचायतींकडेच स्वतःच्या मालकीचे डम्पिंग ग्राऊंड सुविधा असून उर्वरित सर्व ग्रामपंचायतींसाठी केंद्र शासनाच्या ‘स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २’ अंतर्गत पनवेल तालुक्यातील १४५ गावांसाठी ‘स्वतंत्र घनकचरा व्यवस्थापन’ करण्यात येणार असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल पंचायत समितीने सिडको आणि नैना प्राधिकरणाने अधिसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीसाठी कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी नियोजन प्राधिकरण असलेल्या सिडकोकडे सोपविण्याचा प्रस्ताव दिनांक १० मार्च, २०२५ रोजी सिडकोला देऊनही या गावांमधील कचरा सिडकोकडून संकलन केला जात नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील कचरा संकलन सिडकोकडून केला न जाण्याची कारणे काय आहेत तसेच नैना व सिडको अधिसूचित क्षेत्रात टि.पी. विकसित केला जात असताना या ग्रामीण भागात कचरा व्यवस्थापन व्यतिरिक्त अजून कोणकोणत्या सुविधा सिडकोकडून देण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, ‘स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २’ अंतर्गत पनवेल तालुक्यातील १४५ गावांसाठी ‘स्वतंत्र घनकचरा व्यवस्थापन’ हे लवकरात लवकर सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) पनवेल तालुक्यात ७१ ग्रामपंचायती असून १४५ गावे आहेत. पनवेल तालुक्यातील कोन, उसर्ली, व पळस्पे या तीन ग्रामपंचायतींकडे घनकचरा व्यवस्थापनासाठी स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतीमधील १४५ गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी घरगुती कचरा कुंड्या, वैयक्तिक कंपोस्ट पिट, सार्वजनिक कंपोस्ट पिट, प्लास्टिक संकलन केज, कचरा वाहतुकीची वाहने यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

पंचायत समिती, पनवेलद्वारे दिनांक १० मार्च, २०२५ रोजीच्या पत्राद्वारे पनवेल तालुक्यातील सिडको व नैना प्राधिकरणांतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीचे कचरा व्यवस्थापन करण्याबाबत सिडकोकडे प्रस्ताव देण्यात आला. याबाबत दिनांक १७ जून, २०२५ रोजी सिडको समवेत प्राथमिक बैठक झाली. तसेच दिनांक ६/११/२०२५ रोजी पनवेल तालुक्यातील सिडको व नैना या नियोजन प्राधिकरणाच्या अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेबाबत पत्र देण्यात आले.

सद्य:स्थितीत, सिडको अंतर्गत ५ ग्रा.पं.चा कचरा सिडको मार्फत उचलला जातो.
(३) सिडको महामंडळाने नैना प्रकल्पातील १२ नगर-रचना परियोजना अंतर्गत समाविष्ठ असलेल्या ४६ गावांसाठी मूळ गावठाणा अंतर्गत पायाभूत सोयीसुविधा संबंधित योजना आखण्याबाबत गट विकास अधिकारी, पनवेल, जि.रायगड यांना पत्र व्यवहार केला आहे.

त्यानुसार ४६ गावांपैकी गट ग्रामपंचायत नांदगाव, उसर्ली खुर्द आणि ग्रामपंचायत पळस्पे यांना आवश्यक असणाऱ्या विकास कामांच्या मागणीचे पत्र सिडको महामंडळास प्राप्त झाले आहे. परंतु उर्वरित गावठांणाकडून आवश्यक असलेल्या विकास कामांसंबंधित मागण्या संदर्भात अद्यापपर्यंत प्रतिसाद प्राप्त झाला नाही.
(४) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायती (१४५ गावे) मध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी ५७५५५ घरगुती कचरा कुंड्या, ६३२ वैयक्तिक कंपोस्ट पिट, २०३ सार्वजनिक कंपोस्ट पिट, २०२ प्लास्टिक संकलन केज, १३९ कचरा वाहतुकीची वाहने यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत पालीदेवद येथे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत तालुकास्तरीय प्लास्टिक संकलन केंद्र उभारण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळेगाव (शा.पं) (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील जलजीवन मिशन योजनेंतर्गच्या कामांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२८) * ५१९६ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव (शा.पं) (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील जलजीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून याबाबतची चौकशी करून दोषीविरुध्द कारवाई करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री, पाणीपुरवठा यांचेकडे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक २४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान देण्यात आला असून काम विहीत वेळेत पूर्ण न झाल्याने कंत्राटदाराच्या मागणीवरून दोन वेळा मुदतवाढ देऊनही अद्यापही हे काम पूर्ण न झाल्यामुळे याच परिसरातील मौजा काकडधरा व रामदरा (ता.आर्वी, जि.वर्धा) या दोन्ही ग्रामपंचायती मधील ग्रामस्थांना पाणी मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून याप्रकरणी दोषी कंत्राटदार व अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

लोकप्रतिनिधींनी दिलेले निवेदन दिनांक १४/१०/२०२४ रोजीचे नसून दिनांक १२/१०/२०२५ च्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मौजा तळेगाव (शा.प.), ता.आर्वी, जि.वर्धा येथील जल जीवन मिशन अंतर्गतच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करण्याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे नाही.

सदर योजनेच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक २४/०१/२०२३ रोजी देण्यात आला असून,सदर योजनेमध्ये सुधारीत वाढीव वितरण व्यवस्थेच्या कामांमुळे योजनेला दिनांक ३१/१२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.सद्य:स्थितीत मौजा तळेगाव या योजनेंतर्गतच्या काकडदरा व रामदरा या दोन्ही गावांतील ग्रामस्थांना जुन्या व जल जीवन मिशन अंतर्गतच्या नवीन वितरण व्यवस्थेच्या पाईपलाईनमधून नियमित पाणीपुरवठा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात "मिशन वात्सल्य" योजनेची अंमलबजावणी करणेबाबत

**(२९) * ४७०२ श्री.सचिन अहिर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी "शासन आपल्या दारी" या संकल्पनेवर आधारित सुरु केलेली "मिशन वात्सल्य योजना" कोविडनंतर बंद करण्यात आल्याने राज्यातील ८० लाख एकल महिला सदर योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निराधार पेन्शन, शिधापत्रिका, वारसा प्रमाणपत्र, विमा, बँक, आधार, जन्म मृत्यू दाखला, जात प्रमाणपत्र अर्ज पाठविणे, घरकुल, अंत्योदय, आदिवासी, समाजकल्याण, कृषी विभागाच्या योजना असे एकूण २५ विषय 'वात्सल्य समिती' राबविणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना कायमस्वरूपी सुरु करण्याची मागणी लाभार्थी महिलांकडून वारंवार शासनाकडे करण्यात येत असून उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने सदर योजना पुन्हा सुरु करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २७/०८/२०२१ अन्वये चालू करण्यात आलेली "मिशन वात्सल्य" योजना विभागामार्फत कधीही बंद करण्यात आलेली नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक २७/०८/२०२१ मध्ये नमूद विविध विभागांच्या योजनांचा लाभ राज्यातील विधवा व परित्यक्ता महिलांना मिळवून देण्याबाबत तालुकास्तरीय समन्वय समिती मार्फत सहाय्य करण्यात येणार आहे.

(३) महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक २७/०८/२०२१ अन्वये "शासन आपल्या दारी" या संकल्पनेवर आधारित सुरु केलेली "मिशन वात्सल्य योजना" राज्यातील सर्व विधवा व परित्यक्ता यांना लागू करण्याची मागणी सामाजिक संस्थामार्फत शासनास प्राप्त झाली होती. सदर योजनेची व्याप्ती वाढवून सदर योजना राज्यातील सर्व विधवा महिला व परित्यक्ता याकरीता लागू करणेबाबत शासन निर्णय दिनांक १२/०९/२०२५ निर्गमित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुपोषित बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(३०) * ५२५२ श्रीमती चित्रा वाघ, श्री.जगन्नाथ अभ्यंकर, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या (IIPS) अभ्यास अहवालातून राज्यातील पाच वर्षाखालील प्रत्येक तीन बालकांपैकी एक बालक कुपोषित असल्याचे व राज्य शासन बालमृत्यू रोखण्यासाठी कोटयवधी रुपये खर्चाच्या विविध योजना राबवित असतानादेखील गेल्या तीन वर्षांत पालघर,पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती,अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यात शून्य ते पाच वर्ष वयोगटातील तब्बल ४९ हजार ८० बालमृत्यू झाल्याचे व पाच वर्षाखालील ३५ टक्के बालके कमी वजनाची, ३५ टक्के बालकांची वाढ खुंटलेली आणि २६ टक्के बालके कुपोषित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन १९९२ मधील कुपोषणाचे प्रमाण २० टक्क्यांवरुन सन २०२१ मध्ये २६ टक्क्यांवर गेले असून सर्वाधिक जास्त बालमृत्यूची संख्या नागपूरमध्ये ४ हजार २१८ आणि मुंबईत ४ हजार १३४ बालमृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बालकांच्या कुपोषणग्रस्त समस्येचे उच्चाटन करण्यासाठी डॉ.अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील समितीने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, राज्य शासनाने पोषण अभियान, बाल संगोपन केंद्र, अंगणवाडी आहार या योजनेच्या परिणामकतेचा आढावा घेऊन जिल्हानिहाय कुपोषण नियंत्रण कृती व अंगणवाडी व पोषण केंद्रावर डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली लागू करून प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता व राज्यातील बालमृत्यूचे वाढत असलेले प्रमाण रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) अंशत: खरे आहे.

भारतीय लोकसंख्या विज्ञान संस्थेने (IIPS) राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्व्हेक्षण-५ (NFHS-५) मधील माहिती विचारात घेतल्याचे दिसून येते. सदर सर्व्हेक्षण सन २०१९-२० या वर्षामधील आहे. त्यानंतर एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कुपोषण कमी करण्याकरीता विविध उपाययोजना तसेच Real Time Monitoring करण्यात येत असून त्या अंतर्गत दर महिन्याला बालकांचे वजन आणि उंची मोजली जाते. त्याबाबतची नोंद पोषण ट्रॅकर प्रणालीमध्ये दरमहा करण्यात येते. त्याआधारे बालकांची पोषण श्रेणी निश्चित केली जाते.

त्यानुसार, मागील ३ वर्षांमध्ये राज्यातील तसेच अमरावती जिल्ह्यातील स्टंटिंग (उंचीनुसार कमी), वेस्टिंग (उंची व वजनानुसार कमी) आणि अंडरवेट (वयानुसार वजन कमी) याचे प्रमाण कमी होत आहे. तर पालघर, पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यांमधील स्टंटिंगचे प्रमाण वगळता इतर सर्व निर्देशकांमध्ये कुपोषण कमी होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

त्याचप्रमाणे आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार या जिल्ह्यांमध्ये मागील ३ वर्षांमध्ये एकूण १७५१५ बालमृत्यू झाले आहेत.

(२) आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सन २०२१-२२ मध्ये ० ते ५ वर्षे वयोगटातील राज्यातील एकूण बालमृत्यूची संख्या १६७८४ इतकी आहे. त्यापैकी नागपूर जिल्ह्यातील बालमृत्यूची संख्या ११७५ व मुंबईमधील बालमृत्यूची संख्या १४०० एवढी होती.

(३) डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील समितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत:-

१) आरोग्य सेवांचे विकेंद्रीकरण - आरोग्य सेवांचे अधिकार आणि व्यवस्थापन स्थानिक स्तरावर (उदा. जिल्हा, तालुका, गाव) हस्तांतरित करणे.

२) प्राथमिक आरोग्य सेवा बळकट करणे- प्राथमिक आरोग्य केंद्रांचे (PHC) जाळे मजबूत करणे आणि तेथील सुविधा व सेवांचा दर्जा सुधारणे.

३) समुदाय सहभाग - आरोग्य कार्यक्रमांमध्ये स्थानिक समुदायाचा सक्रीय सहभाग वाढवणे (उदा. आशा कार्यकर्त्यांसारख्या सामुदायिक आरोग्य कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे).

४) बाल आणि माता मृत्यू दर कमी करणे -लहान मुलांचे आणि मातांचे मृत्यू दर कमी करण्यावर लक्ष केंद्रित करणे.

५) आदिवासी आरोग्य समस्यांचे निराकरण -आदिवासी भागातील विशिष्ट आरोग्य समस्या आणि गरजा ओळखून त्यावर उपाययोजना करणे इत्यादी.

(४) ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांची वृध्दी संनियंत्रण विषयक माहिती भरण्याकरीता केंद्र शासनाने पोषण ट्रॅकर हे ॲप्लिकेशन विकसित केले आहे. अंगणवाडी सेविकांकडून लाभार्थ्यांची वजन व उंची याचे मोजमाप करून त्याबाबतची माहिती दरमहा सदर ॲपमध्ये नोंदविण्यात येते. सदर माहितीच्या आधारे लाभार्थी बालकांचे सर्वसाधारण, अतितीव्र कुपोषित (SAM), मध्यम कुपोषित (MAM) अशा पोषण विषयक श्रेणीमध्ये वर्गीकरण करण्यात येते. त्यानुषंगाने कुपोषण कमी करण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना THR तर ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच, आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच, ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी/केळी देण्यात येतात. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी तर मांसाहारी बालकांना प्रति दिन १ अंडे देण्यात येते.

३) तसेच, राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम/नागरी बालविकास केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. ग्राम/नागरी बालविकास केंद्रामध्ये सॅम बालकांना तीन वेळा Energy Dense Nutritious Food चा पुरवठा करण्यात येतो तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात येतो.

४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निलंबित जिल्हा जलसंधारण अधिकारी, नागपूर यांची अकार्यकारी पदावर केलेल्या नियुक्तीची चौकशी करण्याबाबत

**(३१) * ५१९१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांच्याकडे सन २०२२ मध्ये प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना त्यांनी गडचिरोली जिल्ह्यातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या सर्वेक्षण कामाचा निधी वितरित करण्याकरीता कंत्राटदारांकडून लाच स्वीकारल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर कार्यालयाकडून त्यांना अटक करुन त्यांच्यावर पोलीस स्टेशन, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर येथे क्र. अप. क्र २१२/२०२२ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचा अटकेचा कालावधी ४८ तासांपेक्षा जास्त असल्याने त्यांना दिनांक २० मे, २०२२ रोजीच्या आदेशान्वये पूर्वलक्षी प्रभावाने शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सेवेतून निलंबित शासकीय सेवेकांना पुनर्स्थापित करताना सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०११ मधील परिच्छेद क्रमांक २ (अ) मधील तरतुदीचे उल्लंघन करुन जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांची त्याच महसूल विभागात अकार्यकारी पदावर नियुक्ती करण्यात आली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी चौकशी करून उक्त दोषी अधिकारी व यास जबाबदार असणारे अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) श्री.कविजीत सु. पाटील, तत्का. जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रभारी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविकांना निवृत्तीवेतन, सेवानिवृत्ती उपदान व मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा प्रोत्साहन भत्ता वितरीत करण्याबाबत

**(३२) * ५४२९ श्री.एकनाथराव खडसे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांना निवृत्तीवेतन, सेवानिवृत्ती उपदान व लाडकी बहिण योजनेचा प्रोत्साहन भत्ता वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाला पाठविण्यात आला आहे मात्र या प्रस्तावाबाबत अद्यापही वित्त विभागाने कोणताही निर्णय घेतला नसल्याने सदरहू प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या व सेवानिवृत्त होणाऱ्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यासह जळगाव जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनीही सेवानिवृत्ती उपदान, निवृत्तीवेतन व इतर मागण्यासंदर्भात दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषदेवर धडक मोर्चा आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यासह जळगाव जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना निवृत्तीवेतन, सेवानिवृत्ती उपदान व लाडकी बहिण योजनेचा प्रोत्साहन भत्ता वितरीत करण्याबाबतच्या प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२) व (३) एकात्मिक बालविकास सेवा योजनेमधील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवानिवृत्तीनंतर एक रकमी लाभाच्या योजनेंतर्गत लाभ देण्यात येतो.

जळगाव जिल्ह्यासह राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी पेन्शन, सेवानिवृत्ती उपदान मिळणेबाबत मागणी केलेली आहे. राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या पेन्शन व सेवानिवृत्ती उपदान प्रस्तावाबाबत शासन स्तरावर विचारविनिमय सुरू आहे. तसेच अंगणवाडी सेविकांना लाडकी बहिण योजनेंतर्गत अनुज्ञेय प्रोत्साहन भत्ता देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अनेक घरकुलांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३३) * ४९४३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत मंजूर झालेली अनेक घरकुले अद्याप पूर्ण झाली नसल्याने सुमारे ४५ टक्के लाभार्थी अपूर्णावस्थेतील घरांमध्ये राहण्यास गेले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घरकुले अद्याप अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत तसेच अपूर्ण उक्त घरकुल त्यांचे काम तातडीने पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यास प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २०२४-२५ चे उद्दिष्ट हे डिसेंबर २०२४ मध्ये तर २०२५-२६ चे उद्दिष्ट जून २०२५ मध्ये प्राप्त झाले.

पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ या वर्षात ११,६६० घरकुले मंजूर असून त्यापैकी २,९७४ घरकुले पूर्ण आहेत.

जून ते ऑक्टोबर दरम्यान पालघर जिल्ह्यात पावसामुळे बांधकामाचा वेग मंदावला होता.परंतु, सद्य:स्थितीत पावसाळा संपल्यामुळे जिल्ह्यातील घरकुल बांधकामाचा वेग वाढला असून अपूर्ण घरे पूर्ण करण्यासाठी मोहीम स्वरूपात कामे सुरू केली असून विहित कालावधीत घरकुले पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने केलेल्या कामांमधील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(३४) * ५०३७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जुन्नर, इंदापूर, दौंड, शिरुर तसेच अन्य तालुक्यांतील जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील उप अभियंत्यांवर गैरव्यवहाराबाबतची गंभीर प्रकरणे समोर येऊनही तसेच या गैरव्यवहाराची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांच्याकडे केली असूनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेने सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमली असून चौकशीचा अहवाल अद्यापही सादर झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इंदापूर येथील उपअभियंता यांच्याकडे दौंड आणि शिरूर येथील रिक्त पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला परंतु त्यांनी अनेक कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट न देता ठेकेदारांची बिले मंजूर करून पैसे अदा केले असल्याचा आरोप काही संघटनांनी केलेला असून याचप्रमाणे दौंड तालुक्यातील एका कामासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने छापा टाकला असता कार्यकारी अभियंता आणि इतर अभियंता यांना रंगेहाथ पकडण्यात आले असतानाही या प्रकरणात त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या दोषी उपअभियंत्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) पुणे जिल्ह्यातील जुन्नर, इंदापूर, दौंड, शिरुर व अन्य तालुक्यातील उपअभियंता यांचेवर मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचेमार्फत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

तथापि, उपअभियंता, जि.प.बांधकाम उपविभाग बारामती यांचे संदर्भात तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करणेकामी दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे. सदर चौकशी समितीमार्फत प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने तक्रारदारास पत्र देण्यात आले असून तक्रारीचे निवारण करण्यात आले आहे.
(३) व (४) इंदापूर येथील उपअभियंता यांच्याकडे दौंड आणि शिरुर येथील रिक्त पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला, परंतु त्यांनी अनेक कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट न देता ठेकेदाराची बिले मंजूर करुन पैसे अदा केले असाही आरोप काही संघटनांनी केलेबाबत अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

दौंड तालुक्यातील एका कामासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कडून छापा टाकला असता पकडण्यात आलेले कार्यकारी अभियंता, उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांचे निलंबन करण्यात आलेले आहे. पुढील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचेकडून सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील रुग्णवाहिका उपलब्ध करुन देताना रुग्णांची आर्थिक फसवणूक होत असल्याबाबत

**(३५) * ५७७९ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे असलेल्या रुग्णवाहिका ना नफा ना तोटा तत्वावर उपलब्ध करून देणे बंधनकारक असतानाही रुग्णांच्या नातेवाईकांकडून अवाजवी रक्कम वसूल करण्यात येत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन गरीब रुग्णांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेत उपलब्ध असलेल्या शासकीय रुग्णवाहिका रुग्णसेवेसाठी वापरतेवेळी कुठलेही शुल्क रुग्णांकडून आकारण्यात येत नाही.

रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांकडून मनमानी रक्कम वसूल केली जात असल्याची बाब ही खाजगी रुग्णवाहिकांसंदर्भातील आहे. तथापि, सदर घटनेबाबतची कोणतीही लेखी तक्रार रुग्णालयाच्या प्रशासनास अद्याप प्राप्त झालेली नाही. उक्त परिस्थितीवर उपाययोजना म्हणून खाजगी रुग्णवाहिकांना रुग्णालयाच्या परिसरात प्रवेश दिला जात नाही. तसेच याबाबतचे मोठे सूचना फलक रुग्णालयाच्या दर्शनीय स्थळी लावण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करण्याकरीता संरक्षण अधिकाऱ्यांची नेमणूक करणेबाबत

**(३६) * ४६८८ श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरातील महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्यान्वये प्रत्येक तालुक्यात पूर्ण वेळ संरक्षण अधिकारी (प्रोटेक्शन ऑफिसर) नेमणे शासनाला बंधनकारक असताना व याबाबत सन २०१४ पासून मा.मुंबई उच्च न्यायालयाने अनेकदा आदेश देऊनही राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी केवळ २८४ तालुक्यातच ही पदे भरली असल्याची बाब दिनांक ७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संरक्षण अधिकारी नेमण्यास दिरंगाई होण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्यान्वये प्रत्येक तालुक्यात पूर्ण वेळ संरक्षण अधिकारी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच नेमणूक दिरंगाई प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी एका जनहित याचिकेच्या संदर्भात कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५ अंतर्गत संरक्षण अधिकारी नेमण्याबाबत आदेशित केले होते. त्यास अनुसरून शासनाने प्रत्येक तालुक्यासाठी एक या प्रमाणे दिनांक १४/०७/२०१४ व दिनांक २९/०१/२०१५ च्या शासन निर्णय अनुक्रमे २१६ व १४२ अशी एकूण ३५८ पदे निर्माण केली आहेत. सदर ३५८ पदे भरण्यासाठी विहित कार्य प्रणालीचा अवलंब करून ३३२ उमेदवारांची निवड करण्यात आली होती. तथापि, प्रत्यक्षात ३०८ उमेदवार

रुजू झाले. तद्नंतर विविध कारणास्तव काही उमेदवार पद सोडून गेल्याने पदे रिक्त झाली होती. जून २०२३ मध्ये रिक्त असलेल्या पदांपैकी ५७ पदे भरण्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून भरती प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. सदर पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. याशिवाय सद्य:स्थितीत रिक्त असलेल्या १७ पदांसाठी दिनांक २०/११/२०२५ रोजीच्या जाहिरातीद्वारे भरती प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आखाडा बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(३७) * ६०९८ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील ग्रामीण भागात साथीचे आजार पसरले असून डेंग्यु, मलेरिया या साथीच्या रोगामुळे आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दररोज ४०० ते ५०० रुग्ण उपचारासाठी येत असून डॉक्टर नसल्याने रुग्णांची प्रचंड गैरसाय होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुरी रुग्णसेवा यंत्रणा, कर्मचाऱ्यांचा कर्तव्यातील हलगर्जीपणा व डॉक्टर वारंवार अनुपस्थित राहत असल्याने दर दिवशी किमान ४०० ते ५०० रुग्णांच्या उपचाराची गैरसोय होत असल्याने या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सकांनी उक्त रुग्णालयाच्या कामकाजात सुधारणा करण्याकरीता चौकशी समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समितीने अहवाल सादर केला आहे काय, त्यानुसार रुग्णांची गैरसोय टाळण्याबाबत व आवश्यक वैद्यकीय सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) ग्रामीण रुग्णालय आखाडा बाळापूर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली या रुग्णालयाकरीता १७ पदे मंजूर असून १२ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. कार्यरत पदांपैकी जिल्हा शल्य चिकित्सक हिंगोली यांनी अंतर्गत व्यवस्थेने वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

सदर रुग्णालयात रुग्णांना उपचार व औषधोपचार योग्य रित्या दिले जात आहेत. तसेच रुग्णांकडून उपचारासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थिती व कामकाजासंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक हिंगोली यांनी चौकशी समिती नेमली आहे.

(३) चौकशी समितीचा अहवाल जिल्हा शल्य चिकित्सक हिंगोली यांना प्राप्त झाला असून चौकशी समितीच्या निष्कर्षानुसार संबंधितांविरूध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी, अशा सुचना शासनाच्या दिनांक २८/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, आरोग्य सेवा मुंबई यांना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेस्ले कंपनीतील कामगार कपात निर्णयामुळे अनेक कर्मचारी बेरोजगार झाल्याबाबत

**(३८)** * **६०८३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेस्ले कंपनीकडून मोठ्या प्रमाणावर कामगार कपात करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने सुमारे १६,००० कामगार बेरोजगार होणार असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सदरील कामगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) अशा स्वरूपाची तक्रार/निवेदन विभागास प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या वाढीसाठी धोरणात्मक निर्णय घेऊन रोजगार निर्मिती करण्याबाबत

**(३९)** * **५०५८ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात लहान-मोठे ८५०० उद्योग असून औद्योगिक क्षेत्रात वाढते वीजदर, जमिनीचे भाव, दुहेरी करप्रणाली, बंद पडलेल्या उद्योगांची विक्री न होणे अशा विविध समस्या असल्यामुळे येथील औद्योगिक क्षेत्रात केवळ १ लाख रोजगार निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात औद्योगिक वाढीसाठी अनुकूल वातावरण असूनही धोरणात्मक निर्णय तसेच स्थानिक व्यवस्थापनाच्या अभावामुळे उद्योगधंदे व स्थानिक रोजगार अडचणीत आल्याने स्थानिकांना पुणे, मुंबई, हैद्राबाद या शहरात रोजगारासाठी स्थलांतरित व्हावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या अडचणी तात्काळ दूर करण्यासाठी व औद्योगिक क्षेत्राच्या वाढीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अमरावती जिल्ह्यात १,१४,७५६ इतके सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग नोंदणीकृत असून त्याद्वारे ३,७८,२७६ एवढी रोजगार निर्मिती झालेली आहे. तसेच १९ मोठे व विशाल प्रकल्प कार्यान्वित असून त्याद्वारे ५१०६ एवढी रोजगार निर्मिती झालेली आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी असलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत लाभ घेवून सन २०१९ पासून एकुण १६८१ उद्योग तसेच पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सन २०१६ पासून एकूण ९७७ उद्योग स्थापीत झालेले असून त्याद्वारे सुध्दा रोजगार निर्मिती झाली आहे व क्लस्टर योजनेंतर्गत एकूण २०० रोजगार निर्मिती झाली आहे.

(२) हे खरे नाही. अमरावती जिल्ह्यात उद्योग धंदे व स्थानिक रोजगार अडचणीत आल्याचे अथवा त्यामुळे स्थलांतरीत व्हावे लागत आहे, याबाबत कोणतेही निवेदन औद्योगिक संघटनेमार्फत या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(३) अमरावती जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर व विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली विभागस्तरावर सर्व संबंधित विभाग प्रमुख व औद्योगिक संघटना यांची एकत्रीत बैठक आयोजित करण्यात येऊन उद्योजकांच्या अडी-अडचणी सोडवण्यासाठी उपाययोजना करण्यात येते.

औद्योगिक क्षेत्राच्या वाढीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून विविध क्षेत्रांमध्ये जमीन संपादन प्रक्रिया सुरू असून औद्योगिक क्षेत्र वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहे.
अमरावती जिल्ह्यामध्ये एकूण १५ औद्योगिक क्षेत्रे आहेत. त्यापैकी टेक्सटाईल पार्क मध्ये १०७६.८० हेक्टर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात असून ५२८.०२ हेक्टर जमीनीचे औद्योगिक क्षेत्राकरीता वाटप झालेले आहे. टेक्सटाईल पार्कमध्ये १७ मध्यम, मोठे व विशाल प्रकल्प कार्यान्वित आहेत.

प्रस्तावित PM MITRA PARK हे अतिरीक्त अमरावती औद्योगिक क्षेत्राला लागुन असून राष्ट्रीय महामार्ग लगत आहे. या पार्क करीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने एकूण ४१०.०२ हेक्टर जमीन अधिग्रहीत केली आहे. प्रथम टप्यामध्ये विकासकामे जसे रस्ते, पाणीपुरवठा, पाईप लाईन, पथदिवे, ड्रेनेज संकलन वाहतूक या सारख्या पायाभूत सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत. ३३/११ KV चे सबस्टेशन मंजूर असून त्याचे काम ई-निविदा प्रक्रियेमध्ये आहे.

औद्योगिक धोरण-२०१९ नुसार अमरावती जिल्हा D+ मध्ये असून सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत १६१ औद्योगिक घटकांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आलेले असून गुंतवणूकीच्या ८०% अनुदानाचा लाभ मंजूर झाला आहे. तसेच महिला धोरण अंतर्गत एकूण ७१ महिला उद्योजकांना गुंतवणूकीच्या १००% अनुदान मंजूर झालेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागा निश्चिती प्रक्रियेस विलंब होत असल्याबाबत

**(४०) * ४६९६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांचे रुग्णालय सुरू करण्याच्या निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, सदर वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव हा योग्य जागेची निश्चिती प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जागा निश्चिती प्रक्रिया अपूर्ण असल्यामुळे महाविद्यालयाच्या इमारत बांधकामास विलंब, मान्यता प्रक्रिया आणि प्रवेश क्षमता निश्चितीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे तसेच वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर वैद्यकीय महाविद्यालयासाठी प्रस्तावित जागांची संख्या, स्थळांचा तपशील, वैद्यकीय समिती व स्थानिक प्रशासन यांच्याकडून पाहणी झाली आहे काय,

(४) असल्यास, सदर वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागा प्रस्ताव निश्चिती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी आवश्यकता प्रमाणपत्र दिनांक १७/१०/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञानिवद्यापीठ यांच्यामार्फत दिनांक ४/११/२०२५ रोजी संलग्नता देण्यात आली आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे पोर्टल सुरु झाल्यानंतर अहिल्यानगर येथील महाविद्यालयाकरीता वैद्यकीय अभ्यासक्रमाचा प्रस्ताव दाखल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत गठित समितीकडून जागेची पाहणी करण्यात आली असून समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील थॅलेसेमिया आजाराचे निर्मुलन करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४१) * ५८९८ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दरवर्षी जवळपास ८०० ते ९०० नवजात बालकांना थॅलेसेमिया आजाराचे निदान होत असून सदर आजारात हिमोग्लोबिन तयार करणाऱ्या जीनमधील बदलामुळे मुलांच्या शरीरात पुरेसे हिमोग्लोबिन तयार होत नाही व राज्यात सध्या थॅलेसेमिया असलेल्या बालकांची संख्या सातत्याने वाढत असल्याची बाब भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या (आयसीएमआर) २०२३ च्या अहवालानुसार निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आजाराच्या जनजागृतीसाठी आणि थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्रासाठी ११ वीच्या प्रवेशावेळी तपासणी सक्तीची करण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थॅलेसेमिया निर्मुलनासाठी आयुक्त आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक संस्था, रेडक्रॉस सोसायटी, इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रतिनिधी, तज्ज्ञ डॉक्टर यांचा समावेश असलेली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी व समितीने कालमर्यादा ठरवून काम सुरू करावे अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत तसेच थॅलेसेमिया आजाराचा राष्ट्रीय सिकलसेलमध्ये समावेश करण्याची मागणी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने केंद्र शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातून थॅलेसेमिया आजाराचे पूर्णपणे निर्मूलन करण्यासाठी व या आजाराचे राष्ट्रीय सिकलसेल मध्ये समावेश करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्रात थॅलेसेमिया रुग्णांची संख्या १२९३८ असून दरवर्षी सरासरी ५०० ते ६०० रुग्णांची भर यामध्ये पडत आहे. तथापि, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचा (आयसीएमआर) २०२३ च्या अहवालामध्ये थॅलेसेमिया आजाराबाबत कोणताही उल्लेख आढळुन आला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

थॅलेसेमिया निर्मुलनासाठी आयुक्त आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली विविध सामाजिक संस्था व तज्ञांचा समावेश असलेली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच थॅलेसेमिया आजाराचा राष्ट्रीय सिकलसेलमध्ये समावेश करण्याची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात येणार आहे.

(४) जागतिक थॅलेसेमिया दिन दिनांक ०८ मे, २०२५ रोजी "एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे" या अभियानाचा शुभारंभ राज्यात करण्यात आलेला आहे.

थॅलेसेमिया आजाराच्या अनुषंगाने जिल्हा पातळीवर थॅलेसेमिया रुग्णांची प्राधान्याने आवश्यकता विचारात घेऊन एमआरआय स्कॅन, सोनोग्राफी, २ डी इको, नियमित रक्त तपासणी चाचणी, सीबीसी, एलएफटी, केएफटी, सिरम फेरिटिन, टीएसएच तपासण्या करण्यात येत आहेत.

थॅलेसेमिया रुग्णांना नियमित मोफत औषधे तसेच गरजेनुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या माध्यमातून राज्यातील सर्व रक्त पेढयांमार्फत मोफत रक्त पुरवठा करण्यात येत आहे.

माध्यमिक शाळेतील विद्यार्थी, कॉलेजमधील विद्यार्थी, लग्नापूर्वी भावी वधू-वर, गरोदर माता इत्यादींचे थॅलेसेमियाबाबत समुपदेशन करण्यात येत आहे.

तसेच थॅलेसेमिया आजाराचा राष्ट्रीय सिकलसेल मिशन मध्ये समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अनेक कर्मचारी बेरोजगार होत असल्याबाबत

**(४२) * ५४१४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतातील सर्वात मोठी आयटी कंपनी असलेल्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस मधील (टीसीएस) तब्बल ३० हजार कर्मचाऱ्यांची कपात केली असल्याने पिंपरी चिंचवड, पुणे, मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर येथील औद्योगिक वसाहतीत मोठ्या प्रमाणात कामगारांवर आर्थिक संकट येण्याची शक्यता निर्माण झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासन अनेक नवीन योजनांमध्ये एआय (AI) या टेक्निकचा वापर करीत असल्याने राज्यातील आघाडीच्या कंपन्याही याच तंत्रज्ञानाचा वापर करू लागल्याने राज्यातील लाखो कुटुंबांचा रोजगार जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यभरातील औद्योगिक कंपन्यातील कर्मचाऱ्यांची कपात रोखण्यासाठी कामगार विभाग आणि राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाची तात्काळ सर्वसमावेशक समिती स्थापन करून शासनास अहवाल देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१), (२) व (३) होय. हे अंशत: खरे आहे.

पुणे विभागातील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) या कंपनीमार्फत सुमारे ३०,००० कर्मचारी कपात केल्याबाबत वेगवेगळया वृत्तपत्रांमध्ये तसेच सोशल मिडियाद्वारे प्रसिध्द झालेले आहे. तसेच NITES या संघटनेचे दिनांक ०१/१०/२०२५ रोजीचे मा.मुख्यमंत्री महोदय यांना अग्रेषित केलेले निवेदन प्राप्त झालेले आहे. तसेच TCS या कंपनीतील ३ कर्मचाऱ्यांनी औद्यागिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २-अ अन्वये अपर कामगार आयुक्त, पुणे या कार्यालयात तक्रार दाखल केलेली आहे.

त्यानुषंगाने कंपनीच्या व्यवस्थापनाकडून माहिती प्राप्त करून घेतली असता व्यवस्थापनाने त्यांच्या दिनांक २१/११/२०२५ रोजीच्या पत्रानुसार सदरहू कंपनीमध्ये पुणे शहरात एकूण ४५,५७५ कर्मचारी कार्यरत असून, त्यापैंकी कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या दोन त्रैमासिक कालावधीत एकूण ३७६ कर्मचाऱ्यांशी चर्चा करून सर्व कायदेशीर देणी (Notice pay months- Gross Salary) म्हणून रुपये ५९ कोटी, ३६ लाख,७८ हजार, १९३/- इतकी रक्कम अदा करून त्यांना कामावरून कमी केल्याचे तसेच, सदरहू कपात केलेले कर्मचारी हे मध्यम व वरिष्ठ स्तरावरील व्यवस्थापक या पदावरील असून, ए.आय. (AI) या तंत्रज्ञानामुळे सदरहू कर्मचाऱ्याची कपात केली नसल्याचे अपर कामगार आयुक्त, पुणे या कार्यालयास कळविले आहे.

वरीलप्रमाणे पुणे विभागाव्यतिरिक्त अन्य मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक व अमरावती या विभागामध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस (टीसीएस) ने कर्मचाऱ्यांची कपात केली असल्याची कोणतीही तक्रार/निवेदने प्राप्त झालेली नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात उद्योग उभारण्यासाठी नवीन औद्योगिक धोरण राबविण्याबाबत

**(४३) * ४८५१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात प्लॉट, रस्ते, नाले, पाणी व विजेचे सब स्टेशन तसेच सोलर पॅनल बसविण्यासाठी कॅश सबसिडी व फायर एन.ओ.सी. या सर्व धोरणात काळानुसार बदल करून नविन धोरण राबविण्याची आवश्यकता असल्याचे तसेच विदर्भातील उद्योग व्यवसायांच्या समस्यांचे स्थानिक पातळीवर निराकरण होत नसल्यामुळे त्याबाबतच्या सर्व फाईल्स ह्या उद्योग मंत्रालयाकडे पाठविण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील उद्योग व्यवसायांच्या समस्या स्थानिक पातळीवरच सोडविण्यासाठी शासनाने उद्योगाबाबतचे नवीन औद्योगिक धोरण जाहीर करावे, औद्योगिक ग्राहकांसाठी विजेचे दर, जुन्या एमआयडीसीचा विस्तार करतांना प्लॉट रस्ते, नाले, पाणी व वीजेची सबस्टेशन उभारावे तसेच विदर्भासाठी नवीन उद्योग आयुक्त नेमण्यात येऊन मंडळात उद्योजकांचा समावेश करावा या मागण्यांसह अन्य मागण्यां स्थानिक उद्योजकांनी शासनाकडे सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी विदर्भातील उद्योजकांनी केलेल्या मागण्यांबाबत व नवीन धोरण राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून औद्योगिक क्षेत्राचा विकास करताना औद्योगिक क्षेत्रात रस्ते, पाणी, वीज, पथदिवे इत्यादी पायाभूत सुविधा पुरविण्यात येतात. विदर्भातील महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट, रस्ते, नाले, पाणी व वीजेचे सब स्टेशन व फायर एन.ओ.सी. या सर्व बाबत आवश्यक ते बदल म.औ.वि.महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मंजूरीने केले जातात.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात नव्याने प्रस्थापित होणाऱ्या अथवा विस्तारीकरणाकरीता येणाऱ्या प्रस्तावांना सन-२०१६ पासून ऑनलाईन पध्दतीने अग्निशमनाचे "तात्पुरते अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र" अदा करण्यात येते. तात्पुरत्या अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्रात सुचविण्यात आलेल्या अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांची पुर्तता केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने "अंतिम अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र" अदा करण्यात येते.

विदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विभागीय अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालय कार्यान्वित केले असून विभागीय अग्निशमन केंद्र हिंगणा येथे कार्यरत आहे. तसेच बुटीबोरी, अकोला व अमरावती या अग्निशमन केंद्रात अग्निशमन केंद्र अधिकारी कार्यरत असून त्यांच्यामार्फत उद्योगांना "तात्पुरते अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र" व "अंतिम अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यात येतात व त्यासाठी उद्योजकांना त्यांचे अर्ज मऔवि महामंडळाच्या मुंबई मुख्यालय येथे सादर करावे लागत नाही.

"महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम - २००६" व मऔवि महामंडळाच्या "विकास नियंत्रण नियमावली - २०२३" च्या तरतुदीनुसार मऔवि महामंडळाने ५००० चौ.मी. च्या भूखंडाना व २००० चौ.मी.च्या कमी धोकादायक उद्योग असलेल्या बांधकामाना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार मऔवि महामंडळाच्या विशेष नियोजन प्राधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत मऔवि महामंडळाच्या अग्निशमन विभागामार्फत देण्यात येणारे तात्पुरते व अंतिम अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र अदा करण्याकरीता कालमर्यादा ठरविण्यात आली असून, त्याप्रमाणे कामकाज करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गत अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देण्याबाबत

**(४४) * ५१२१ डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत ज्या बालकांचे आई किंवा वडील कोणत्याही कारणामुळे मृत झालेले आहेत अशा कुटुंबांसाठी 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना' जाहीर करून त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ आणि त्यासाठी समाज कल्याण मेळाव्यांमध्ये सामाजिक अहवाल प्रस्ताव तयार करण्याचे काम अंगणवाडी सेविकांकडे सोपविण्यात आले असून राज्यातील अनेक गावांतील अंगणवाडी सेविकांना योजनेच्या अटी, दस्तऐवज प्रक्रिया, सामाजिक अहवाल सादरीकरण आणि पात्रता निकष याबाबत आवश्यक प्रशिक्षण न दिल्यामुळे योजनेचा प्रस्ताव प्रक्रिया करताना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक पात्र लाभार्थी बालकांना अशा अडचणींमुळे योजनेचा लाभ वेळेवर मिळत नसून, जिल्हास्तरावरून आलेल्या अहवालांवरही कार्यवाही होण्यास विलंब होत असल्याने अंगणवाडी सेविकांना 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना' बाबत स्पष्ट मार्गदर्शन, ऑन-फिल्ड प्रशिक्षण आणि आवश्यकता असल्यास डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे

(२) हे खरे नाही.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गत लाभार्थ्यांचा सामाजिक अहवाल तयार करण्याची जबाबदारी जिल्हा बाल संरक्षण कक्षाची असून सदर काम त्यांच्यामार्फतच करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## आलेगाव (ता.पातूर, जि.अकोला) ग्रामपंचायतीने दिव्यांगांसाठीचा निधी खर्च केला नसल्याबाबत

**(४५) * ५२१८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींना त्यांच्या उत्पन्नातून दिव्यांगांच्या कल्याणासाठी किमान ५ टक्के निधी वापरणे बंधनकारक असतानाही आलेगाव (ता.पातूर, जि.,अकोला) येथील ग्रामपंचायतीने मागील चार वर्षांपासून या निधीचा लाभ एकाही दिव्यांगाला दिला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांगांना अथवा दिव्यांगांच्या बचत गटांवर सदर निधी खर्च करणे बंधनकारक असताना संबंधित सरपंच, ग्रामसेवक यांनी सदरहू निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) ग्रामपंचायत आलेगांव कडून सन २०२१-२२ मध्ये ५ टक्के दिव्यांगाकरीता रुपये ७५,०००/- खर्च केलेला आहे. तथापि, सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये सदर बाबीवर खर्च झालेला नाही.
(२) व (३) मागील तीन वर्षात झालेल्या सततच्या नापिकीमुळे ग्रामपंचायतीच्या करवसुलीवर परिणाम होऊन करवसुली पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीस प्राप्त झालेल्या तुटपुंज्या निधीमधून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन प्राधान्याने अदा करण्यात आले असल्याने, दिव्यांग बांधवाकरीता करावयाचा खर्च झालेला नाही. तथापि, मागील तीन वर्षातील दिव्यांगासाठी अनिवार्यपणे खर्च करावयाची थकबाकीची (५ टक्के निधी) रक्कम शासन निर्णय ग्रामविकास विभाग दिनांक २५ जुन २०१८ मधिल निर्देशानुसार जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाकडील दिव्यांग कल्याण निधीमध्ये वर्ग करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी सन २०२२-२३ व २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात करवसुलीसाठी जबाबदार ग्रामपंचायत सचिव श्री गजानन डिवरे यांना निलंबीत करुन त्यांचेविरुध्द सद्यस्थित खाते चौकशी सुरु आहे.

तसेच, सन २०२४-२५ या वर्षात श्री.आर.एच.देशमुख सचिव म्हणून कार्यरत होते. त्यांचे कार्यकाळात ग्रामपंचायत करवसुलीचे प्रमाण कमी असल्याकारणाने ५ टक्के दिव्यांग बांधवावर करावयाचा खर्च निधी अभावी झालेला नाही. श्री.आर.एच.देशमुख हे सद्य:स्थितीत सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र परिचर्या परिषद कायद्यातील तरतुदीचे व नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करणेबाबत

**(४६) * ४८२७ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २६,३५३ पैकी ५१३४ रुग्णालयांमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता, स्वच्छतेचा अभाव, बायोमेडिकल कचऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी अपुरे नियोजन, पारदर्शक देयके आणि तक्रार निवारण यंत्रणेचा अभाव अशा विविध त्रुटी आढळून आल्या असून, उक्त ५१३४ रुग्णालयांनी महाराष्ट्र परिचर्या परिषद कायद्यातील तरतुदीचे व नियमांचे पालन केले नसल्याने त्या रुग्णालयांना माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास कारणे दाखवा नोटीस पाठविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी या रुग्णालयांनी पुढील ३० दिवसात त्रुटींची पूर्तता न केल्यास त्यांचे परवाना रद्द करण्यात येईल असे सदर नोटीस मध्ये नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर त्रुटींचे स्वरुप काय आहे तसेच विहीत मुदतीत त्रुटींची पूर्तता न केलेल्या रुग्णालयांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

राज्यात महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी कायदा १९४९ अंतर्गत राज्यातील नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांची तपासणी करण्याचे आदेश सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत माहे जानेवारी, २०२५ मध्ये स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी यांना देण्यात आले होते.

सदर तपासणीमध्ये त्रुटी आढळून आलेल्या ४५३८ रुग्णालयांना नोटीसी बजावण्यात आल्या होत्या.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी कायदया मध्ये नमूद केल्यानुसार,रुग्णालयाच्या दर्शनी भागात दरपत्रक लावणे व इतर बाबी या त्रुटींची पूर्तता न केलेल्या रुग्णालयांना सुधारणा करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून, मुदतवाढीनंतर सुधारणा न करण्यात आलेल्या रुग्णालयांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खुटिदा (ता.चिखलदरा, जि.अमरावती) गावात मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४७) * ५५५० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुटिदा (ता.चिखलदरा, जि.अमरावती) हे गाव मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असून या गावातील ग्रामस्थांसह शिक्षक, विद्यार्थी, वयोवृध्द नागरिक यांना खंडू नदीवर पूल नसल्याने दररोज नदी ओलांडण्यासाठी पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे तसेच नंदुरबार जिल्ह्यात बहुतांश गावांमध्ये रस्त्यांची दूरवस्था झाली असून दुर्गम भागातील अनेक विद्यार्थ्यांना दरवर्षी पावसाळयात नदी–नाले पार करुन शाळेत जावे लागत असल्याचे व येथील गावांमध्ये रस्ते, वीज व इतर सुविधा उपलब्ध नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील इतर गावांमध्ये नद्या व नाल्यांवर पुलाची सोय नसल्याने येथे रुग्णवाहिका पोहचणे शक्य नसल्याने या भागातील गर्भवती महिलांना डोलीने रुग्णालयात न्यावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करून त्यानुषंगाने अमरावती जिल्ह्यातील एकताई ग्रामपंचायत अंतर्गत खुटिदा आणि सुमिता या गावांसह अन्य ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्त करण्याकरीता, नद्यांवर पूल बांधण्याकरीता तसेच सदर दुर्गम भागातील गावांमध्ये वीज व इतर सुविधा उपलब्ध व मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

खुटिदा ता.चिखलदरा जि.अमरावती हे गाव व्याघ्रप्रकल्पात समाविष्ठ असल्याने व्याघ्र प्रकल्प विभागाकडुन सदर रस्त्याचे बांधकामाकरीता परवानगी प्राप्त होत नाही. मेळघाटातील रस्त्यांची जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना, जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेंतर्गत सुधारणा करण्यात येत असते. खंडू नदीवर १२५ मीटर लांबीच्या पुलाची आवश्यकता आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास सुचित केले आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा, धडगाव व तळोदा तालुक्यातील काही भाग अतिदुर्गम क्षेत्रात असून संपूर्ण क्षेत्र हे वनहद्दीत स्थित आहे. सदर क्षेत्र हे तीव्र उताराचे असल्याने पावसाळ्यात रस्त्यांची काही अंशी दुरवस्था होत असते. परंतु दुरवस्था झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे वेळोवेळी प्रस्तावित करण्यात येत असतात. नंदुरबार जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या गावे/पाड्यांचे सर्वेक्षण करुन ५६ ठिकाणी साकव (लहान पुल) बांधकामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर साकव बांधकामांसाठी जोडरस्त्यांचे देखील सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. सदरील रस्ते योजनाबाह्य असल्याने व काही भाग वनहद्दीत असल्याने वनविभागाची पूर्व परवानगी घेऊन शासन स्तरावर मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

तसेच अतिदुर्गम भागातील योजनाबाह्य १०५ रस्त्यांचे सर्वेक्षण करुन रस्ते दर्जोन्नतीचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांना सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रत्यारोपणासाठी अवयवांची मागणी व उपलब्धता यातील तफावत दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४८) * ४८१२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवयवदानाच्या दिशेने सकारात्मक बदल होत असताना प्रत्यारोपणासाठी अवयवांची कमतरता भासत असून राज्यात मेंदूमृत अवयवदात्यांची (ब्रेन डेड) संख्या वाढली आहे परंतु प्रतीक्षा यादीत रुग्णांची संख्या वाढत असून मागणी व उपलब्धता यातील तफावत दूर करण्याचे आव्हान आरोग्य यंत्रणेसमोर निर्माण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात मुंबई, पुणे व नाशिक या तीन विभागांमध्ये प्रतिक्षायादी सर्वाधिक असून याबाबत शासनाने माहिती घेऊन राज्यात अवयवदाना संबंधित कायदेशीर प्रक्रिया सुलभ करताना लाईव्ह डोनर प्रोग्राम तसेच अद्ययावत डिजिटल ऑर्गन रजिस्ट्री प्रणाली, आधार कार्डशी संलग्नित प्रतीक्षा यादी व पारदर्शकता ठेवणारी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व याबाबत व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) डिजिटल ऑर्गन रजिस्ट्री प्रणाली व आधार कार्ड संलग्नित प्रतीक्षा यादी अस्तित्वात आहे. रुग्णालयामार्फत रुग्णाचे NOTTO या केंद्र शासनाने स्थापन केलेल्या नॅशनल रजिस्ट्रीमध्ये रुग्णाच्या आधार कार्डाद्वारे ऑनलाईन पध्दतीने नोंदणी केली जाते. रुग्णाला Unique ID क्रमांक प्राप्त झाल्यानंतर सदर ID क्रमांक वापरुन रुग्णाचे संबंधित ZTCC च्या प्रतिक्षायादीमध्ये नोंदणी केली जाते. ZTCC मार्फत अत्यंत गरजु व गरजु अशी वर्गवारी करुन अवयवांचे पारदर्शकपणे वाटप केले जाते.

अवयवदानाबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्याकरीता रिजनल ऑर्गन व टिश्यु ट्रान्स प्लान्ट ऑर्गनायझेशन (ROTTO) आणि स्टेट रिजनल ऑर्गन व टिश्यु ट्रान्स प्लान्ट ऑर्गनायझेशन (SOTTO) व राज्यातील विभागीय प्रत्यारोपण समन्वये केंद्रे मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर यांचेमार्फत पथ नाटय, बॅनर्स, पोस्टर्स, सिनेमागृहांमध्ये जाहिराती, रेडिओ जिंगल्स तसेच चर्चासत्राद्वारे कार्यक्रम राबविण्यात येत असतात. अवयवदानाची टक्केवारी वाढण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत दरवर्षी महाअवयवदान महोत्सव ही राज्यस्तरीय मोहिम राबविण्यात येते. या अभियानांतर्गत अवयवदान जनजागृतीसाठी रांगोळी स्पर्धा, लघुचित्रफिती दाखविणे, चर्चासत्रे, रॅली, सामुहिक शपथ कार्यक्रम, मार्गदर्शन पर शिबिरे आयोजित करण्यात येतात.

केंद्र शासनाने सन २०२५-२६ या वर्षात अंगदान-जीवन संजीवनी अभियान या नावाने वर्षभर जनजागृती मोहिम राबविण्याकरीता घेतलेल्या निर्णयाचा भाग म्हणून राज्यात ३ ऑगस्ट, २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५ अवयवदान पंधरावडा म्हणून साजरा करण्यात आला. सदर कालावधीत खालील उपक्रम राबविण्यात आले.

१. समाज माध्यमाद्वारे जनजागृती अभियान - डिजिटल माहिती पुस्तिकेचे समाजमाध्यमांवर प्रसारण करण्यात आले, तज्ञ/ सेलेब्रिटी/धर्मगुरु यांचे संदेश व्हिडीओ प्रसारीत करण्यात आले. अवयव लाभार्थ्यांची मुलाखत प्रसारीत करण्यात आली.

२. नोटोच्या वेबपोर्टलद्वारे व QR code द्वारे अवयवदान प्रतिज्ञा नोंदणी- राज्यातील विविध विभागातील कार्यालयामध्ये अवयवदानाची शपथ घेण्यात आली. दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालवधीत राज्यामध्ये जवळ जवळ ५०,००० व्यक्तीने ऑनलाईन प्लेजिंग केलेले आहे.

३. जिल्हा रुग्णालये/उपजिल्हा रुग्णालये /ग्रामीण रुग्णालये/ प्राथमिक आरोग्य संस्था मधील कार्यरत डॉक्टर, नर्सेस व इतर कर्मचारी वर्गाकरीता अवयवदान जनजागृतीकरीता व्याख्याने आयोजित करण्यात आली व सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेकडून अवयवदानाचे फॉर्म भरुन घेण्यात आले.

४. राज्यामध्ये विविध ठिकाणी अवयवदान जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली.

५. शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना अवयवदानाचे महत्त्व सांगून अवयवदानाबाबत चित्रकला, रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

६. राज्यातील शासकीय तसेच खाजगी रुग्णालयामध्ये अवयवदान जनजागृती विषयक पोस्टर्स, बॅनर्स लावून जनजागृती करण्यात आली.

७. विभागीय प्रत्यारोपण समन्वय समिती मुंबई व रिजनल ऑर्गन ॲन्ड टिश्यु ट्रान्सप्लान्ट ऑर्गनायझेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व नोंदणीकृत अवयव प्रत्यारोपण केंद्रे, सर्व नॉन ट्रान्सप्लान्ट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर, सर्व शासकीय रुग्णालये, बॉम्बे नर्सिंग कायद्यांतर्गत नोंदणीकृत असलेली सर्व

खाजगी रुग्णालये यांच्या करीता लोकमान्य टिळक म्युनि. जनरल हॉस्पीटल सायन मुंबई येथील सभागृहात दिनांक १३/०८/२०२५ प्रत्यक्षरित्या व दिनांक १५/१०/२०२५ रोजी ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

८. दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ रोजी राज्यातील सर्व जिल्हयांचे पालक मंत्र्यांचे हस्ते ११७ अवयवदात्यांच्या नातेवाईकांचा सत्कार करण्यात आला.

९. राज्यात एकूण ४९ ठिकाणी नॉन ट्रान्सप्लान्ट रिट्रायव्हल सेंटरची स्थापना करण्यात आलेली आहे व वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत कोऑर्डीनेटरची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत (उमेद) ग्रामीण भागात जिल्हा विक्री केंद्र उभारण्याबाबत

**(४९) * ५३०८ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील महिला बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या उमेद-(महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती) अभियान अंतर्गत राज्यातील १० जिल्हयांमध्ये उमेद मॉल (जिल्हा विक्री क्रेंद्र) उभारण्यास दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी शासनाने एकूण २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार सदर १० जिल्हयांमध्ये उमेद मॉल (जिल्हा विक्री क्रेंद्र) उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, दिनांक ११/०८/२०२५ अन्वये उमेद मॉल बांधण्याकरीता प्रति जिल्हा कमाल रुपये २० कोटी इतका खर्च अनुज्ञेय राहील, असा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रथमत: १० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल उभारण्याकरीता जिल्ह्यांची निवड करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## न्हावा-शेवा पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(५०) * ४७३२ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका, सिडको, जेएनपीटी, एमएमआरडीए या संस्थांना व परिसराला एकूण २२८ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येणाऱ्या रुपये ४९३.७९ कोटी किंमतीच्या वाढीव न्हावा-शेवा पाणीपुरवठा योजनेस विलंब होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ मध्ये मंजूर झालेली सदर योजना सन २०२४ मध्ये पूर्ण करणे आवश्यक असतानाही उक्त योजना दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत तसेच सदरहू योजना पूर्ण होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर योजना दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्यास विलंब होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.-

कोवीड-१९ ह्या साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे मशीनरी, मनुष्यबळ व कामकाजाबाबत आलेली बंधने आणि मर्यादा, कामाच्या कार्यादेशानंतर स्टील साहित्यांच्या दरात झालेली असाधारण भाववाढ त्यामुळे पाईप पुरवठा करण्यास कंत्राटदाराकडून झालेला विलंब, पळस्पेफाटा ते भोकरपाडा दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्ग लगतची अतिक्रमणे, कोवीड १९ च्या लॉकडाऊन पर्यंतच्या कालावधीत जागेच्या भू-संपादनाच्या कार्यवाहीस झालेला विलंब, जागेचा मोबदला न मिळाल्याने जलवाहिन्या टाकणेस संबंधित जागा मालकांचा अडथळा व रेल्वे, एक्सप्रेस वे, Toll Plaza क्रॉसिंग व ONGC परिसरातून जलवाहिनी टाकण्यास ONGC ने परवानगी नाकारणे इ. कारणे आहेत. तसेच, ठेकेदार मे. जी.व्ही.पी. आर.इंजिनिअर्स, हैद्राबाद यांचेकडून नियोजनानुसार काम होत नसल्याने त्यांचेवर दंडात्मक कारवाई सुरु आहे.

त्याचप्रमाणे नवी मुंबई विमानतळामुळे सभोवतालच्या परिसरामध्ये झालेल्या व होत असलेल्या विविध संस्था जसे की, राष्ट्रीय महामार्ग, MMRDA, MSRDC इ. यांचेमार्फत होणारे रस्त्याचे प्रकल्पामुळे योजनेतून टाकण्यात आलेल्या पाईपलाईनचे स्थलांतरण करणे अपरिहार्य होत आहे. पर्यायाने योजनेच्या भौतिक व आर्थिक गोष्टींवर बंधने येत असून कामास विलंब लागत आहे.

सदर योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी विविध विभागांच्या परवानग्या जसे की, रेल्वे, वन विभाग, विद्युत विभाग, एच.पी.सी.एल., महानगर गॅस, गेल इंडिया, ओएनजीसी तसेच रस्त्यालगत असलेली अतिक्रमणे हटविणेबाबत एम.एस.आर.डी.सी. व एम.एम.आर.डी.ए. यांचेशी समन्वय ठेऊन आवश्यक कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील मौजा नांदपुर व इतर गावांतील शेतीपिकांचे नुकसान टाळण्यासाठी नाला खोलीकरण व रुंदीकरण करण्याबाबत

**(५१) * ५४१८ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा नांदपुर येथील शेत सर्वे नं. १५७/२ मौजा लाडेगाव, मौजा कर्माबाद, मौजा देऊरवाडा येथे नाल्यांमध्ये पावसाळ्यात पुराचे पाणी येऊन परिसरातील सर्वच शेतामध्ये पाणी घुसत असल्याने शेती पिकांचे नुकसान होत असल्यामुळे नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व सिमेंटीकरण करण्याबाबतचे निवेदन मा.मंत्री, मृद व जलसंधारण यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार नाला खोलीकरण रुंदीकरण व सिमेंटीकरण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.लोकप्रतिनिधीनी केलेल्या निवेदनात नमूद गावांपैकी मौजा नांदपूर, मौजा देऊरवाडा व मौजा कर्माबाद ही गावे सन २०२५-२६ चे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत नाला खोलीकरणासाठी समाविष्ट करण्यात आलेली आहेत. तसेच निवेदनातील उर्वरित कामांबाबत नियतव्ययाच्या उपलब्धतेनुसार विचार करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात लखपती दीदी योजनेची अंमलबजावणी करणेबाबत

**(५२) * ४८०५ श्री.सचिन अहिर, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बँकांमार्फत प्रत्येक गावात लाडक्या बहिणींना एक लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली असून, सदर योजनेतून राज्यातील एक कोटी महिलांना "लखपती दीदी" बनविण्याचा शासनाचा संकल्प असल्याचे जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घोषणेनुसार जिल्हा बँकामार्फत हे बिनव्याजी कर्ज मंजूर करण्यासाठी कोणता शासन निर्णय जारी करण्यात आला आहे तसेच सदर योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांची निवड, अर्ज प्रक्रिया, कर्जाचे निकष, महिला बचत गटांची भूमिका, कर्ज परतफेडीचा कालावधी तसेच जिल्हा बँकांची भागीदारी याबाबत शासनाने कोणती नियमावली ठरविलेली आहे,
(३) असल्यास, राज्यातील कोणत्या जिल्ह्यांमध्ये अद्यापपर्यंत सदर योजना प्रत्यक्ष अंमलात आणली गेली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये सहकार विभागाने सर्वसमावेशक बाबींचा उल्लेख करुन एकत्रित शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत निर्णय झाला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील अंगणवाडीच्या पोषण आहारात किडे आढळून आल्याबाबत

**(५३) * ५२५९ श्रीमती चित्रा वाघ, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील कर्तार रुग्णालयाच्या शेजारच्या दारुल सलाम अंगणवाडी क्रमांक १३६ मध्ये बालकांना दिल्या जाणाऱ्या खिचडीत पोर किडे आढळून आले असल्याचा गंभीर प्रकार दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार अंगणवाडी कर्मचारी संघटनेने एकात्मिक बालविकास प्रकल्पाकडे (आयसीडीएस) केली असून, खिचडी पुरवठा करणाऱ्या महिला मंडळाशी संपर्क साधला असता त्यांनी याबाबतची जबाबदारी टाळली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पुरवठा करणाऱ्या महिला मंडळ, प्रकल्प अधिकारी तसेच महिला व बालविकास विभाग यांच्याकडून आहाराच्या गुणवत्तेबाबत योग्य देखरेख न ठेवल्याने घडलेल्या सदर घटनेमुळे बालकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन होत असल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी अंगणवाडी कर्मचारी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी समाज माध्यमातून अंधेरी (मुंबई) येथील कर्तार रुग्णालयाच्या शेजारील दारूल सलाम अंगणवाडी क्रमांक १३६ मध्ये बालकांना दिलेल्या खिचडीत किडे दिसल्याचा एक व्हिडीओ प्रसारित झाल्याची बाब निदर्शनास आली. यानंतर, अंधेरी पश्चिम (नागरी) या प्रकल्पाचे बालविकास प्रकल्प अधिकारी व मुख्यसेविका यांनी अंगणवाडीत प्राप्त झालेल्या आहाराची चौकशी करण्यासाठी सदर अंगणवाडीला भेट दिली. सदर अंगणवाडी तसेच संबंधित महिला बचत गटाकडून ज्या इतर अंगणवाड्यांना गरम ताजा आहार पुरवठा होत आहे, तेथील कोणत्याही पालकांकडून गरम ताजा आहार पुरवठ्याबाबत कोणतीही तोंडी अथवा लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी अंगणवाडी कर्मचारी संघटनेची तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अंगणवाडी क्रमांक १३६ येथे आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटास खुलासा सादर करण्याविषयी कळविले होते. तसेच, सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता चौकशी समिती गठीत केली. त्यानुसार, सदर समितीमधील सदस्यांनी अंगणवाडी क्रमांक १३६ मधील लाभार्थी व पालकांकडे दिनांक ३१/०८/२०२५ रोजी प्राप्त झालेल्या गरम ताजा आहाराच्या दर्जाबाबत विचारणा केली. त्यावेळी कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच, पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या खुलाशामध्ये चांगल्या प्रतीचा आहार पुरवठा केल्याबाबत तसेच भविष्यातही चांगल्या दर्जाचा आहार पुरवठा करण्यात येईल याची हमी दिलेली आहे.

अंगणवाडीस्तरावर गरम ताजा आहार पुरवठा होत असताना, सदर आहाराची केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार योग्यता तपासून पाहण्यासाठी अंगणवाडीमध्ये प्राप्त होणाऱ्या गरम ताजा आहाराची रॅन्डमली NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमध्ये तपासणी केली जाते. सदर तपासणीअंती आहार योग्य प्रथिने व उष्मांक (कॅलरी) युक्त आणि खाण्यास योग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदर आहाराची देयके अदा केली जातात.

अंगणवाडी स्तरावर गरम ताजा आहार प्राप्त झाल्यानंतर अंगणवाडी सेविका व मदतनीस प्रथम आहार योग्य आहे की नाही याची तपासणी करतात आणि त्यानंतरच लाभार्थ्यांना अंगणवाडीमध्ये आहार खाऊ घातला जातो. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन केले जात नाही. तसेच, प्रकल्प स्तरावरून गरम ताजा आहाराच्या पुरवठ्याबाबत अंगणवाडी भेटी व किचन भेटी या माध्यमातून योग्य तो पाठपुरावा केला जातो.

खबरदारीचा उपाय म्हणून अंगणवाडी क्रमांक १३६ येथे पुरवठा झालेल्या आहाराचे नमुने NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी दिल्यानंतर आहार केंद्र शासनाच्या मानकांनुसार योग्य असून खाण्यास सुरक्षित असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खोपोली, धाटाव, महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतींमधील उद्योगधंदे पुनर्जिवित करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५४) * ४९६८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली, धाटाव, महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतींतील पायाभूत सुविधांचा अभाव, वीज आणि पाणी पुरवठ्यातील अनियमितता, प्रदूषण नियंत्रणाचे कठोर नियम, ग्रामपंचायतीची वाढती कर प्रणाली अशा समस्यांमुळे अनेक उद्योग बंद पडल्याची आणि काही उद्योग आर्थिक स्थितीमुळे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योगांच्या बंद पडण्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर आणि रोजगारावर मोठा परिणाम झाल्याने औद्योगिक वसाहतीतील बंद पडलेले उद्योग पूर्ण क्षमतेने सुरु होण्याकरीता तसेच सुरु असलेल्या उद्योगांच्या समस्या सोडविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अधिनियम, २००६ अन्वये रायगड जिल्ह्यातील तालुका खोपोली येथे १०२९८, ता.रोहा येथे ५२८२ आणि तालुका महाड येथे ६७१० उद्यम रजिस्ट्रेशनची नोंदणी झालेली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने धाटाव (रोहा) व महाड औद्योगिक क्षेत्रामध्ये आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविलेल्या आहेत. त्यामध्ये रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा योजना, सांडपाणी निस्सा:रण योजना इत्यादींचा समावेश आहे.

खोपोली तालुक्यातील उद्योग घटक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित येत नसून ते विखुरलेल्या स्वरुपात कार्यरत आहेत. यातील बहुतांश उद्योग घटक हे स्वत:च्या बोअरवेलव्दारे पाणी वापरत आहेत.

खोपोली, धाटाव, महाड (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील उद्योग घटक बंद पडण्याच्या मार्गावर असलेबाबत शासनाकडे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी प्रक्रिया प्रलंबित ठेवल्याबाबत

**(५५) * ५७८६ श्री.संदीप जोशी, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.संजय केणेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, श्री.योगेश टिळेकर, श्री.विक्रांत पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १० हजार होमिओपॅथीक डॉक्टरांनी आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सीसीएमपी) पूर्ण केला असून या डॉक्टरांची नोंदणी करण्याचे राज्य शासनाने दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निर्देश देऊनही महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) सदर नोंदणी प्रक्रिया प्रलंबित ठेवल्यामुळे होमिओपॅथी डॉक्टरांनी तातडीने ३० दिवसांत नोंदणी प्रक्रिया पूर्ण न केल्यास धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए) मा.उच्च न्यायालयात या सुधारणांना आव्हान दिले असता एक वर्षाचा आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सीसीएमपी) पूर्ण करणाऱ्या होमिओपॅथी डॉक्टरांच्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेतील (एमएमसी) नोंदणीला अंतरिम स्थगिती देण्यास मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालय व राज्य शासनाने नोंदणीला परवानगी देऊनही महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी प्रक्रिया प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) Certificate Course in Modern Pharmacology (CCMP) अभ्यासक्रम उत्तीर्ण करणाऱ्या राज्यातील नोंदणीकृत होमिओपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ मधील अनुसूचीच्या नोंद २८ करीता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने स्वतंत्र नोंदणी पुस्तक ठेवून दिनांक २५/०६/२०१४ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये केलेल्या सुधारणेची अंमलबजावणी, रिट याचिका क्र.७८४६,७८४७/२०१४ मधील दिनांक १४/०३/२०१६ चे अंतरिम आदेश व सदर याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्याबाबत दिनांक ०५/०९/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेस निर्देश देण्यात आले आहेत. सदर प्रकरण अद्यापही मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अचलपूर (जि.अमरावती) येथील फिनले मिल कंपनी व्यवस्थापनाने कामगारांचे वेतन व बोनस अदा न केल्याबाबत

**(५६) * ५०६२ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर (जि.अमरावती) येथील "फिनले" मिल कामगारांना मागील ६ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने त्यांनी माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास आंदोलन केल्यानंतर या कामगारांना तीन महिन्याचे वेतन व बोनस देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला पण त्यानंतर पुढे कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीच्या कामगारांना अद्याप थकीत वेतन न मिळाल्याने दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ पासून अन्नत्याग आंदोलन सुरु केल्याबाबतचा अहवाल जिल्हा पोलीस प्रशासनाने कामगार विभागास तसेच कंपनी व्यवस्थापनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून उक्त कंपनीच्या कामगारांचा थकीत पगार व बोनस देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच दोषी कंपनी प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा पोलीस प्रशासनामार्फत कामगार विभागास अशा प्रकारचा अहवाल प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(३) फिनले मिल, अमरावती ही मिल राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचा अधिकृत उपक्रम असून याबाबत समूचित शासन हे केंद्र शासन आहे. त्यामुळे सदर मिल मधील कामगारांचे थकीत वेतन व बोनस मिळणेबाबत राज्य शासनाच्या कामगार विभागाकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नाही. तथापि, उपस्थित तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने कामगारांच्या थकीत वेतनाबाबत फिनले मिल व्यवस्थापनाकडून दिनांक २०/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तसेच, उप मुख्य श्रम आयुक्त (केंद्रिय), नागपूर यांच्याकडून दिनांक २७/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त माहितीनुसार फिनले मिल मधील पे-रोल वर असणाऱ्या ७५२ कामगार/कर्मचाऱ्यांना माहे-जानेवारी, २०२५ पर्यंत वेतन अदा करण्यात आलेले आहे.
त्यामध्ये अत्यावश्यक सेवेतील जे कर्मचारी कामावर रूजू आहेत, त्यांना जानेवारी, २०२५ पर्यंत १००% वेतन दिले आहे व उर्वरित कामगारांना माहे-जून, २०२३ पर्यंतचे १००% वेतन व माहे-जून, २०२३ ते जानेवारी, २०२५ पर्यंतचे ५०% वेतन अदा करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोदा (जि.नंदुरबार) तालुक्यातील दुर्गम भागात वैद्यकीय सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५७) * ४६९८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नयामाळ (ता.तळोदा, जि.नंदुरबार) येथे घरी प्रसुती झालेल्या मातेला तिच्या नवजात बाळासह उपचारासाठी १० किलोमीटर अंतर असलेल्या आरोग्यकेंद्रात झोळीतून नेत असताना खराब रस्त्यामुळे

बालकाचा मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण व आदिवासी भागात रस्ते व आरोग्यसेवा अभावी अशा गंभीर घटना वारंवार घडत असून, ज्या दुर्गम भागामध्ये रुग्णांची वाहतूक करण्यासाठी रस्ते सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी उत्तराखंड व हिमाचल प्रदेशातील आरोग्य व्यवस्थेचा अभ्यास करून पर्यायी वाहतूक सुविधा पुरविण्याचे आश्वासन सार्वजनिक आरोग्य, मंत्री यांनी माहे जुलै, २०२५ मध्ये वा त्यासुमारास दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यातील सदर घटनेच्या अनुषंगाने जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने येथे रुग्णवाहिकांसह पुरेशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नंदुरबार जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय येथे एकूण ११७ रुग्णवाहिका (क्र.१०२) सदयःस्थितीत उपलब्ध आहेत. तसेच आज अखेर क्र.१०८च्या एकूण रुग्णवाहिका १४ आहेत.

तज्ञ डॉक्टरांच्या कमतरतेमुळे नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी प्रसुती तज्ञ व बालरोग तज्ञ तसेच विशेष तज्ञ वैदयकिय अधिकाऱ्यांची नाशिक विभागातून रोटेशन पध्दतीने प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे.

लक्ष्य ८४ दिवस कार्यक्रम अंतर्गत स्थानिक पातळीवर आशा कार्यकर्ती आणि आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत प्रत्येक गरोदर मातेस प्रसुतीपूर्वी ४२ दिवस अगोदर भेटी देऊन संस्थात्मक प्रसुतीकरीता प्रोत्साहन देण्यात येत असते.तसेच संभाव्य प्रसुती पूर्वी गरोदर मातेस माहेर घर योजनेंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करुन घेण्याबाबत जनजागृती व प्रयत्न सुरु आहेत.

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा, धडगाव व तळोदा तालुक्यातील काही भाग अतिदुर्गम क्षेत्रात असून संपूर्ण क्षेत्र हे वनहद्दीत स्थित आहे. या कार्यक्षेत्रातील दुर्गम ५६ ठिकाणी साकव बांधकामासाठी जोडरस्त्यांचे सर्वेक्षण बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. तसेच अतिदुर्गम भागात योजनाबाहय रस्ते असल्याने १०५ रस्त्यांचे सर्वेक्षण करुन रस्ता दर्जोन्नती साठी प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोदा (जि.नंदुरबार) तालुक्यातील दुर्गम भागात वैद्यकीय सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५८) * ५८३६ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळसवडे (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथे शासनाच्या लघुपाटबंधारे योजनेतंर्गत३२ हेक्टर क्षेत्रामध्ये २६७९ सहस्र घनमीटर क्षमतेच्या धरणाचे बांधकाम सुरु असून धरण बांधकामाच्या प्रारंभी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी आणि झाडे ताब्यात घेताना तेथील स्थानिक ग्रामस्थ व शेतकऱ्यांना विश्वासात न घेता त्यांच्या सह्या घेण्यात आल्या असल्याच्या तक्रारी शेतकरी व ग्रामस्थांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाकरीता संपादित जमीन, झाडे, गोठे व इतर मालमत्ता गमावलेल्या अनेक ग्रामस्थांना त्यांच्या जमिनींचा आणि मालमत्तेचा मोबदला मिळालेला नाही किंवा मोबदला कोणत्या निकषांवर आणि कोणत्या टप्प्यावर वितरित करणार याची माहिती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुळसवडे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील उक्त धरणातील बाधित स्थानिक ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या सर्व तक्रारींचा विचार करून, त्यांना विश्वासात घेऊन हे धरण प्रकल्प पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) तुळसवडे ल.पा. योजनेसाठी एकूण २८/८३/३१ हे.आर. इतकी खाजगी जमीन संपादित करावयाची असून भूसंपादन मोजणीची प्रक्रिया सुरु असताना तुळसवडे येथे उपविभागीय अधिकारी, राजापूर यांची बैठक घेवून ग्रामस्थांना माहिती दिली आहे. तसेच वेळोवेळी ग्रामस्थांच्या शंकांचे निरसन करण्यात आले आहे.

सदर योजनेचे भूसंपादन, पुनर्वसन आणि वाजवी भरपाईसह पारदर्शकतेचा अधिकार कायदा २०१३ अन्वये शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यात येणार असून याबाबतची सविस्तर माहिती बाधित शेतकऱ्यांना देण्यात आली आहे.

सदर योजनेच्या भूसंपादन प्रकरणी सामाजिक परिणाम निर्धारण (SIA) अहवाल तयार करण्याची कार्यवाही सेक्रेटरी, भाकर सेवा संस्था, मु.पो. कोंडे यांचेकडून प्रगतीपथावर आहे.

सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर जनसुनावणी आयोजित करुन भूसंपादनाबाबतची अद्यायावत माहिती बाधित शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बारु (जि.अकोला) येथील तलावाची भिंत फुटल्यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(५९) * ५६५४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारु (जि.अकोला) या गावांतील सिंचन विभागाच्या तलावाचे सन १९७७-७८ मध्ये बांधकाम करण्यात आले असून सदर तलावाची क्षमता ७० टीसीएम असून त्याची दुरुस्ती सन २०१३-१४ मध्ये करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारु गावांतील सदर तलावाची भिंत माहे सप्टेंबर,२०२५ मध्ये फुटल्यामुळे बारु, बीजू, धावडी, ढाकणा, अकोट व परतवाडा मार्गावरील वाहतूक रस्ता पाण्याखाली गेल्याने खंडीत झाल्यामुळे तेथील ग्रामस्थ, विद्यार्थी व शासकीय कर्मचारी त्यांची ये-जा करण्यास गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलाव फुटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्याबाबत पंचनामे करण्यात येत असल्याचे तहसिलदार, ग्रामसेवक व कृषी अधिकारी यांनी सांगितले असले तरी त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच पिकांच्या भरपाईबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर तलावाची भिंत दिनांक ०२/०९/२०२५ रोजी रात्री ४ ते ५ च्या दरम्यान फुटल्यामुळे रस्त्यावरुन दोन फुट पाणी वाहत असल्यामुळे कोणतीही दुर्घटना घडू नये याकरीता दोन तीन तासाकरीता पोलीस सुरक्षेसह सुरक्षा कठडे लावून ये-जा करण्याकरीता रस्ता तात्पुरता बंद करण्यात आला होता व नंतर लगेचच रहदारीसाठी खुला करण्यात आला होता.तसेच तलावाचे पाणी रस्त्यावरुन वाहल्यामुळे रस्त्याचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही.
तलाव फुटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तहसिलदार, ग्रामसेवक व कृषी अधिकारी यांच्या मार्फत पूर्ण करण्यात आले असून अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.